रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३४४
www.ramprahar.com
◆ गुरुवार, २ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## केंद्राची घुसखोरांवर सर्वंकष कारवाईची तयारी



**नवी दिल्ली :** देशभरातून नऊ लाखांहून अधिक घुसखोरांचे उच्चाटन करण्यात आल्यानंतर केंद्र सरकार आता अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने बेकायदेशीर घुसखोरांविरोधात व्यापक कारवाईची तयारी करीत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बेकायदेशीर स्थलांतरितांची ओळख पटवणे, त्यांना परत पाठवणे आणि त्यांच्यासाठी आधारभूत ठरणाऱ्या यंत्रणेला नष्ट करणे यासाठी एक ठोस रणनीती आखण्याकरिता उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. या पार्श्वभूमीवर सर्व राज्यांच्या पोलीस महासंचालकांची ४ जुलै रोजी एक महत्त्वपूर्ण बैठक बोलावण्यात आली आहे. दरम्यान, या बैठकीत इंटेलिजन्स ब्युरो, रॉ, नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी, बॉर्डर सिक्युरिटी फोर्स आणि सशस्त्र सीमा बल यांच्यासारख्या केंद्रीय संस्थांचे वरिष्ठ अधिकारीही सहभागी होणार आहेत.

### अंतरंग

नेरुळमध्ये साचलेल्या पाण्यात उतरला विद्युतप्रवाह/२
उरण महाविद्यालयात विकसित भारत परिसंवाद/६
फ्रान्सची स्वीडनवर ३-०ने मात/८

# रायगड जिल्ह्यात पावसाची संततधार

## पुढील तीन दिवस ऑरेंज अलर्ट

**अलिबाग : प्रतिनिधी**

पावसाने बुधवारी (दि. १) सकाळपासूनच रायगड जिल्ह्यात संततधार कायम ठेवली. अधूनमधून काही काळ विश्रांती घेत असला तरी जोरदार सरींमुळे जिल्ह्यातील जनजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले होते. जिल्ह्यातील नद्या दुथडी भरून वाहत होत्या. दक्षिण रायगडातही पावसाचा जोर होता. बुधवारी सकाळी संपलेल्या २४ तासांत म्हसळा तालुक्यात सर्वाधिक १६९ मिमी पावसाची नोंद झाली.

दक्षिण रायगडमध्ये महाड, माणगाव, रोहा, म्हसळा आणि श्रीवर्धन तालुक्यांमध्ये पावसाचा जोर होता. पावसामुळे काळ, पाताळगंगा, भोगावती, गांधारी आणि सावित्री या प्रमुख नद्यांच्या पाणी पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. नागोठणे परिसरातून वाहणारी अंबा नदी इशारा पातळीच्या वर पोहचली असून प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.



**धरणांमधील साठ्यात वाढ**

पावसामुळे जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठ्यातही समाधानकारक वाढ झाली असून दोन धरणे १०० टक्के भरली आहेत.

हवामान विभागाने रायगड जिल्ह्यासाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. २ ते ४ जुलै या कालावधीत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत नद्या, ओढे आणि धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होण्याची शक्यता असून सखल भागात पाणी साचणे, पूरसदृश परिस्थिती निर्माण होणे तसेच घाट परिसरात दरडी कोसळण्याचा धोका वाढू शकतो. त्यामुळे नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा. अरबी समुद्र खवळलेला राहण्याची शक्यता असल्याने रायगडातील मच्छीमारांनी पुढील सूचना मिळेपर्यंत समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासन सतर्क झाले असून नदीकाठच्या आणि सखल भागातील नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

### महामार्गावर पाणी, वाहतूक मंदावली

मुंबई–गोवा महामार्गावरील माणगावजवळील ढालघर फाटा येथे रस्त्यावर पाणी साचल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करत वाहने चालवावी लागली. अनेक ठिकाणी मुख्य रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे वाहतुकीचा वेग मंदावला. दिवसभर पावसाने रायगड जिल्ह्याला अक्षरशः झोडपून काढले.

### तालुकानिहाय पडलेला पाऊस (मिमी)

अलिबाग ६५, मुरूड १५१, पेण ७०, पनवेल ११९.२, उरण ७३, कर्जत ८९, माथेरान १०७.४, खालापूर ३८, रोहा ६५, सुधागड १११, माणगाव १३२, तळा १६२, महाड ६९, पोलादपूर १०८, श्रीवर्धन १६७, म्हसळा १६९
एकूण – १६९५.६, सरासरी – १०५.९७.

## मुंबईसह उपनगरातही मुसळधार पाऊस

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईसह उपनगरातदेखील बुधवारी (दि. १) मुसळधार पाऊस पडला असून अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याच्या घटनाही घडल्या आहेत. त्यातच हवामान खात्याने पुढील काही तास मुसळधार पावसाचा इशारा दिला असून पुढील दोन ते तीन दिवस पावसाचा जोर असाच राहणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.

दरम्यान, पालघर जिल्ह्यातील वसई आणि विरारमध्ये मुसळधार पाऊस पडला. यात अनेक वाहने वाहून गेली असून उपनगरातही पावसाचा जोर कायम होता. संभाव्य मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी इंदूराणी जाखड यांनी जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि अंगणवाड्यांना सुट्टी जाहीर करण्याचे आदेश दिले आहेत. सबवे पाण्याखाली गेल्याने घराबाहेर पडणे कठीण झाले होते.

## दिल्ली-मुंबई महामार्गावर बस-ट्रकचा भीषण अपघात

### सात जणांचा होरपळून मृत्यू, २२ जखमी

**दौसा (राजस्थान) : वृत्तसंस्था**

दिल्ली–मुंबई द्रुतगती महामार्गावर राजस्थानच्या दौसाजवळ एका ट्रॅव्हल्स बस आणि ट्रेलरचा भीषण अपघात होऊन सात जणांचा मृत्यू, तर २२ जण जखमी झाले आहेत. हा अपघात बुधवारी मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास दिल्ली–मुंबई एक्स्प्रेस वेवर दौसाजवळ झाला.

ऋषिकेशहून मध्य प्रदेशातील इंदूरकडे वेगाने जाणारी स्लीपर बस आधी एका ट्रेलरला धडकली. या भीषण धडकेनंतर दोन्ही वाहनांनी पेट घेतला. दुर्घटनेचे समोर आलेले व्हिडीओ अत्यंत भयावह असून दोन्ही वाहने आगीच्या ज्वाळांमध्ये होरपळत असताना प्रवासी मदतीसाठी आक्रोश करीत असल्याचे दिसत होते.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार बसचा वेग खूप जास्त होता. धडक इतकी जोरदार होती की बसच्या वरच्या बर्थवरील स्लीपर सीटवरील प्रवासी थेट खाली फेकले गेले. आगीत होरपळल्यामुळे पाच प्रवाशांचा, तर डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे दोन प्रवाशांचा मृत्यू झाला. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काहींची प्रकृती गंभीर आहे.

## पोलीस अधिकारी नितीन ठाकरे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त मंगळवारी सुकापूर येथील स्पाइसवाडी येथे सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या उपस्थितीत त्यांना गौरवण्यात आले.



या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, महापौर नितीन पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक गणेश कडू, नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेवक सुनील बहिरा, भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक सुमित झुंजारराव, माजी नगरसेविका नीता माळी, इकबाल काजी, सुरेखा मोहोकर, सारिका भगत, सुहासिनी शिवणेकर, मयूरेश नेतकर, सतीश पाटील, औदुंबर पाटील, उमेश इनामदार, दादासाहेब सूर्यवंशी तसेच एसीपी बाळा कुंभार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नितीन ठाकरे यांनी आपल्या सेवाकाळात बजावलेल्या कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि जनतेप्रति असलेल्या संवेदनशील कार्याचा गौरव केला. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांना सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात पोलीस अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. भावनिक वातावरणात झालेल्या या समारंभात उपस्थितांनी नितीन ठाकरे यांच्या उल्लेखनीय सेवेला सलाम करीत त्यांच्या निरोगी व आनंदी निवृत्त जीवनासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## निवडक

### कुंभमेळ्यासाठी शासनाकडून ३४ हजार कोटींचा विकासनिधी

**मुंबई :** नाशिक येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्यासाठी आवश्यक विकासकामे वेळेत पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध असून कोणत्याही कामाला निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. कुंभमेळ्यासाठी केंद्र व राज्य शासनासह विविध यंत्रणांमार्फत एकूण ३४ हजार ७३२.३९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून आवश्यक निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

### विनापरवानगी आयव्हीएफ केंद्र चालवणाऱ्यांवर `मकोका` लावणार

**मुंबई :** राज्यातील विनापरवाना ‘आयव्हीएफ’ केंद्रे तसेच गर्भलिंग निदानाच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारने कठोर पावले उचलली आहेत. विनापरवाना आयव्हीएफ केंद्रे चालवणे व बेकायदेशीर गर्भलिंग निदान यांसारख्या गुन्ह्यांत सहभागींवर आता ‘मकोका’ अंतर्गत कारवाई करण्याची तरतूद पुढील अधिवेशनात केली जाईल, अशी घोषणा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी बुधवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली.

## शुभेच्छा...



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागातील पनवेल कार्यालयाचे प्रमुख एस. एन. गुजर हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी मंगळवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांनी आपल्या सेवाकाळातील अनुभवांबाबत संवाद साधत भविष्यातील वाटचालीसाठी आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एस. एन. गुजर यांच्या दीर्घ, प्रामाणिक व समर्पित सेवाकार्यासाठी त्यांचे अभिनंदन करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रथमेश गुजरही उपस्थित होते.**

## सचिन अहिर यांची विधान परिषद उपसभापतिपदी बिनविरोध निवड

**मुंबई : प्रतिनिधी**

विधान परिषदेच्या उपसभापतिपदासाठी शिवसेना शिंदे गटाकडून आमदार सचिन अहिर यांनी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या विरोधात ठाकरे गटाने ऐनवेळी जगन्नाथ अभ्यंकर यांचा उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने सचिन अहिर यांची आवाजी मतदानाने बिनविरोध निवड झाल्याचे बुधवारी (दि. १) जाहीर करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार उपस्थित होते.

शिंदे गटाकडून सचिन अहिर, तर ठाकरे गटाकडून जगन्नाथ अभ्यंकर यांनी उपसभापतिपदासाठी अर्ज दाखल केला होता. विधान परिषदेच्या पक्षीय बलाबलानुसार सचिन अहिर यांचा एकतर्फी विजय निश्चित मानला जात होता, मात्र सभागृहात भाजप नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जगन्नाथ अभ्यंकर यांना अर्ज मागे घेण्याची विनंती केली. भाजपच्या विनंतीला मान देत ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी उमेदवारीचा प्रस्ताव मागे घेत असल्याचे सांगितले. अनिल परब म्हणाले की, सभागृहाची इच्छा आहे की सर्वानुमते निवड व्हावी. त्यामुळे आम्ही जगन्नाथ अभ्यंकर यांच्या उमेदवारीचा अर्ज मागे घेत आहोत. त्यानंतर आवाजी मतदानाने सचिन अहिर यांची उपसभापती म्हणून निवड झाली.

**मुख्यमंत्री फडणवीसांकडून अभिनंदन**

विधान परिषदेच्या उपसभापतिपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल सचिन अहिर यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले. सभागृहाचा मान राखत विरोधी पक्षांनी प्रस्ताव मागे घेतल्याबद्दलही त्यांनी आभार मानले. उपसभापतिपदाच्या खुर्चीवर बसल्यावर प्रत्येकाला न्याय द्यायचा असतो. अहिर ते काम करतील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.



## आळंदीत ४ ते ९ जुलैदरम्यान विवाह सोहळ्यांना बंदी

### भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचे कडक निर्देश

**आळंदी : प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्याची लगबग सुरू झाली असून ८ जुलैला श्रींच्या पालखीचे मंदिरातून पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. प्रस्थानाच्या पहिल्या दिवशी पालखीचा मुक्काम गांधीवाडा येथील दर्शन मंडप इमारतीत असेल, तर ९ जुलैला पालखी पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होईल. या पार्श्वभूमीवर लाखो वारकऱ्यांची आळंदीत गर्दी होणार असल्याने भाविकांच्या सुरक्षेसाठी आळंदीत ४ ते ९ जुलैदरम्यान विवाह सोहळ्यांना बंदी घालण्यात आली आहे

याबाबत आळंदी पोलीस ठाण्यात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.



वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला आळंदी नगर परिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्यासह शहरातील सर्व धर्मशाळा आणि मंगल कार्यालयांचे मालक–चालक उपस्थित होते. पालखी सोहळ्याच्या काळात होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेता ४ ते ९ जुलै या कालावधीत आळंदीतील कोणत्याही धर्मशाळा किंवा मंगल कार्यालयांमध्ये विवाह, साखरपुडा यांसारखे कौटुंबिक कार्यक्रम आयोजित करू नये, असे स्पष्ट निर्देश वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांनी दिले आहेत. तसेच या काळात शहरात नवीन बांधकामे पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

भाविकांच्या विशेषतः महिलांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. जुन्या व धोकादायक इमारती असलेल्या धर्मशाळांमध्ये दिंड्यांचा मुक्काम पूर्णपणे टाळण्याचे निर्देश देण्यात आले असून आवश्यक दुरुस्तीनंतरच अशा इमारती वापरता येतील. सर्व धर्मशाळा आणि मंगल कार्यालयांमध्ये महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र निवास आणि बंदिस्त स्नानगृहांची व्यवस्था असणे बंधनकारक आहे. सुरक्षेच्या दृष्टीने सर्व परिसरामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा चोवीस तास कार्यरत ठेवावी. अनोळखी व्यक्तींना प्रवेश देऊ नये आणि कोणत्याही संशयास्पद हालचाली आढळल्यास तातडीने '११२' या आपत्कालीन क्रमांकावर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आयशर-कारच्या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू

**मानवत :** परभणीच्या कोल्हा गावाजवळ आयशर आणि कारचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे.



अपघातात कारमधील दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर आयशरचा चालक जखमी झाला आहे. त्याच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. एर्टिगा कारमध्ये गणेश निर्मळ आणि माऊली निर्मळ हे दोघे जण प्रवास करत होते. त्यानंतर कार आणि पुढून येणाऱ्या आयशरमध्ये अपघात झाला. अपघात एवढा भीषण होता की कारचा पूर्ण भाग हा चकनाचूर झाला आहे. त्यामुळे कारमधील दोघांचा जागीच मृत्यू झाला.

## नागोठण्याची मानसी ठरली मिसेस महाराष्ट्र २०२६ची मानकरी

**नागोठणे : बातमीदार**

स्मृती एंटरप्रायझेस प्रस्तुत “द ज्वेल वन पेजंट मिसेस महाराष्ट्र २०२६” या भव्य सौंदर्य स्पर्धेचा ग्रँड फिनाले नुकताच पुणे येथे दिमाखात पार पडला. या स्पर्धेसाठी संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील तब्बल सहा प्रमुख शहरांमध्ये ऑडिशन्स घेण्यात आले होते. या स्पर्धेत ५०० पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला, ज्यामधून कठोर निवड प्रक्रियेनंतर ५० उत्कृष्ट स्पर्धकांची ग्रँड फिनालेसाठी निवड करण्यात आली. अत्यंत रंगतदार आणि चुरशीच्या या अंतिम फेरीत नागोठणे येथील मानसी वाळंज–मोकल यांनी आपला आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व, सौंदर्य आणि उत्कृष्ट सादरीकरणाच्या जोरावर संपूर्ण महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक पटकावत “मिसेस महाराष्ट्र २०२६” हा किताब जिंकला.

महाराष्ट्राच्या मानाचा मुकुट आता मानसी वाळंज–मोकल यांच्या नावावर झाला आहे. हा प्रतिष्ठेचा सोहळा स्मृती एंटरप्राइजेस यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता. मानसी वाळंज–मोकल यांच्या यशामुळे त्यांच्या कुटुंबासह संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांनी अनेक महिलांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे.



# वारकऱ्यांच्या ‘चरण सेवेला’ प्रारंभ

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा ‘भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची’ उपक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

आषाढी वारीदरम्यान पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांना मोफत आरोग्यसेवा आणि चरण सेवेचा लाभ मिळावा, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील ‘चरण सेवा’ उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे.




राज्यातील ११ जिल्ह्यांतील पालखी मार्गावरील सुमारे ४०० मुक्कामस्थळी हा उपक्रम राबविण्यात येणार असून, १२ हजारांहून अधिक डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक वारकऱ्यांच्या सेवेसाठी सज्ज राहणार आहेत. वारकऱ्यांच्या पायांवरील ताण कमी करण्यासाठी सुमारे ३ हजार लिटर औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायांची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयात संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच गरजेनुसार रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

याशिवाय, पालखी मार्गावर ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैली आणि प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन वारकरी व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे. कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले की, गतवर्षी ‘चरण सेवा’ उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमातून १ लाख ७५ हजारांहून अधिक वारकऱ्यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांपेक्षा अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला.

‘भक्ती विठोबाची सेवा आरोग्याची’ या संकल्पनेवर आधारित ‘चरणसेवा’ उपक्रमातून वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देण्यात आली असून, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख आणि पालखी मार्गावरील नागरिकांना या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# पोलादपूर तालुक्यातील कुंभळवणे ते पायटे गावादरम्यान आंबेनळी घाटात दरड कोसळली

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील आंबेनळी घाटाच्या रुंदीकरणाच्या कामामुळे उभे कापण्यात आलेल्या डोंगरांनी आता पाऊस सुरू होताच लाल मातीचे ढिगारे घाट रस्त्यावर ढकलण्यास सुरुवात केली आहे. मंगळवारी संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास पोलादपूर तालुक्यातील कुंभळवणे ते पायटे गावादरम्यान एका मोठ्या दगडासह लाल मातीचा ढिगारा आणि एक झाड अशी साधारणपणे वीस ते पन्नास मीटर अंतराची दरड कोसळली. दरम्यान, पावसाळा सुरू झाल्यापासून पोलादपूर तालुक्यात तीन दिवस शंभरी पार पाऊस पडल्याची नोंद तहसिल कार्यालयातील आपत्ती निवारण कक्षातून प्राप्त झाली आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक सतीश पवार आणि सहकारी घटनास्थळी तातडीने पोहोचले आणि त्यांनी आंबेनळी घाटातील वाढत्या वाहतूक नियंत्रण करण्यात यश मिळवले. तब्बल तासाभरानंतर वाडा कुंभरोशी ते पायटा या दरम्यान रुंदीकरणाच्या कामांमध्ये वापरण्यात येणारा जेसीबी दरड कोसळलेल्या ठिकाणी येऊन दाखल झाला. यावेळी तुफान अतिवृष्टी सुरू असल्याने रस्त्यावरील मलबा हटवण्याच्या कामांमध्ये पावसाचा अडथळा सुरू राहिला. अर्धा तास सुरू असलेल्या दरड हटवण्याच्या कामात कापलेल्या डोंगरातून पुन्हा माती आणि पाणी सुरू झाल्याने हे ठिकाण धोकादायक ठरले आहे. पोलिसांनी एक बाजूची वाहतूक सुरू करून पोलादपूरकडील वाहने पुढे महाबळेश्वर कडे मार्गस्थ केली. त्यानंतर पायटा ते दाभिळ टोक दरम्यान उभ्या असलेल्या वाहनांना पोलादपूरकडे रवाना केले.

दरम्यान, पोलादपूर तालुक्यात २३ जून रोजी पावसाला सुरुवात झाल्यापासून आजपर्यंत पावसाने २४ जून रोजी १२९ मिमी, सोमवारी २९ जून रोजी १३० मिमी तसेच आज बुधवारी सकाळी नोंदलेली १०८ मिमी अशी तीनवेळा शतकपार नोंद झाली असून बुधवारी दिवसभर पावसाची संततधार सुरू राहिली.

# झोपेत असताना बेडरूममधील स्लॅब कोसळला; पनवेलमध्ये तरुणाचा मृत्यू

**पनवेलः वार्ताहर**

कामोठे सेक्टर-१० येथील साई सिद्धी सोसायटीमध्ये बुधवारी (दि.१) पहाटे घडलेल्या दुर्दैवी घटनेत घरातील बेडरूमचा स्लॅब कोसळून ३९ वर्षीय सुरेश लोखंडे यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत त्यांची १२ वर्षीय मुलगी वेदिका लोखंडे जखमी झाली असून तिच्यावर कामोठ्यातील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.




मिळालेल्या माहितीनुसार, कामोठे सेक्टर-१०, प्लॉट क्रमांक ६१ येथील सहा मजली साई सिद्धी सोसायटीतील फ्लॅट क्रमांक १०१ मध्ये लोखंडे कुटुंब वास्तव्यास आहे. बुधवारी सकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास सुरेश लोखंडे आणि त्यांची मुलगी वेदिका बेडरूममध्ये झोपलेले असताना अचानक बेडरूमचा स्लॅब कोसळला. स्लॅबचा मोठा भाग सुरेश लोखंडे यांच्या अंगावर व छातीवर पडल्याने ते गंभीर जखमी झाले. तसेच काही भाग मुलगी वेदिकाच्या अंगावर पडल्याने तिच्या हाताला दुखापत झाली.

आवाज ऐकून सोसायटीतील रहिवासी घटनास्थळी धावले आणि दोघांना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र डॉक्टरांनी सुरेश लोखंडे यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे कामोठे परिसरात शोककळा पसरली आहे. कुटुंबातील कर्ता पुरुष गमावल्याने लोखंडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुर्घटनेनंतर इमारतीच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

# बीएलओचे काम करत असताना शिक्षकाला हृदयविकाराचा झटका

**पेण : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ च्या एसआयआर मोहिमेंतर्गत माहिती घेण्यासाठी घरोघरी येणाऱ्या शासकीय प्रतिनिधींना या संदर्भातील बीएलओचे काम करण्याची ट्रेनिंग पेण नगरपालिका सभागृहात मागच्या दोन- तीन दिवसांपासून देत असताना आज सकाळी यातील नगरपालिका शाळेतील शिक्षक आसिफ दळवी यांना तिथेच अस्वस्थ वाटून हृदयविकाराचा झटका आला त्यांना तात्काळ म्हात्रे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे .

सद्या त्यांची प्रकृती स्थिर आहे.पेणच्या नगरपालिका अंतर्गत असणाऱ्या प्राथमिक शाळा क्रमांक ५ मधील शिक्षक आसिफ शमसुद्दीन दळवी हे आज शासनाच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेचे काम नगरपालिकेच्या सभागृहात करत असताना त्यांना अचानकपणे चक्कर येऊन संपूर्ण शरीरावर घाम फुटू लागल्याने ते तिथेच खाली पडले असता त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याचे पाहता तेथील उपस्थितांनी त्यांना लागलीच सरकारी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना पुढे हलविण्यासाठी सांगितले असता अंतोरे फाटा येथील म्हात्रे हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले असून पुढील उपचार सुरू असून सध्या शिक्षक असिफ दळवी यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजत आहे.

# नेरुळमध्ये साचलेल्या पाण्यात उतरला विद्युतप्रवाह; दोन विद्यार्थिनी गंभीर जखमी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरुळमध्ये बुधवारी सकाळी विद्युतप्रवाहाच्या घटनेत दोन अल्पवयीन विद्यार्थिनी जखमी झाल्या. एल.पी. ब्रिजखाली बिकानेर स्वीट्ससमोरील परिसरात शॉर्टसर्किट झाल्यानंतर साचलेल्या पाण्यात विद्युतप्रवाह पसरल्याची माहिती समोर आली आहे. शुभांगी नलवडे आणि उज्वला वाघ (दोघीही वय १५) या विद्यार्थिनी त्याच्या संपर्कात आल्या. दोघींवर सुरुवातीला डी. वाय. पाटील रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी वाशीतील फोर्टिस रुग्णालयात हलविण्यात आले असून, दोघींची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.



पावसामुळे नेरुळ येथील एल.पी. ब्रिजखाली पाणी साचले होते. त्याचवेळी एका विद्युत वाहिनीत शॉर्टसर्किट झाल्याने पाण्यात विद्युतप्रवाह पसरल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या परिसरातून जात असताना विद्यार्थिनी करंटच्या संपर्कात आल्या आणि खाली कोसळल्या. परिसरातील नागरिक आणि प्रत्यक्षदर्शींनी तातडीने त्यांना बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.घटनेची माहिती मिळताच नेरुळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. शॉर्टसर्किट नेमके कशामुळे झाले, संबंधित वायर कोणत्या यंत्रणेच्या अखत्यारीतील होती आणि पाण्यात विद्युतप्रवाह कसा पसरला, याचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात कृषिदिनानिमित्त सामूहिक वृक्षारोपण



**कर्जत : प्रतिनिधी**

येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि राज्याच्या हरितक्रांतीचे जनक स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित होणारा कृषी दिन सहयोगी संशोधन संचालक डॉ. बी.डी. वाघमोडे यांच्या अध्यक्षतेखाली सामूहिक वृक्षारोपण कार्यक्रम घेऊन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ.वाघमोडे यांनी 'डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या संशोधन आणि शिफारशींमुळे कोकणच्या कृषिचा चेहरामोहरा बदलत असून भात उत्पादकतेत लक्षणीय वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न ही वाढले आहे. देशाला ४० टक्के परकीय चलनही भातातूनच मिळते, याकडे त्यांनी लक्ष वेधले. शेतकरी हेच आपले दैवत आहेत,याची जाणीव ठेवून नवतंत्रज्ञान अवलंबून सामाजिक जबाबदारी पार पाडल्यास स्व .नाईक यांना अभिप्रेत असलेला कृषी विकास होऊन देश सुजलाम सुफलाम होईल.प्रत्येकाने झाडे लावून ती जगविण्या साठी प्रामाणिक प्रयत्न करावे' असे आवाहन त्यांनी केले.

कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी कै. वसंतराव नाईक यांच्या ऐतिहासिक कार्याचा नेटक्या शब्दात आढावा घेतला.मागासवर्गीय व्यक्तीला संधी मिळाल्यास राज्यकारभार चालविण्यात तो कसा आगळावेगळा ठसा उमटवू शकतो. याचे नाईक साहेब मूर्तिमंत उदाहरण होय. असे त्यांनी नमूद केले.' एक पेड माँ के नाम ' अभियानाची आठवण ठेवून प्रत्येकाने वृक्षारोपण करून वृक्ष संवर्धन करण्याचा ध्यास घ्यावा, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी डॉ. महेंद्र गवई, डॉ. नामदेव म्हसकर, डॉ. मीनाक्षी केळुस्कर, डॉ. जीवन कदम, महेशकुमार, विद्यार्थी ज्ञानेश्वर पाटील, अथर्व शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

कृषी दिनानिमित्त सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी,मजूर तसेच विद्यार्थ्यांनी हिरीरीने सहभाग घेऊन श्रमदानातून मोठ्या प्रमाणावर सामूहिक वृक्षारोपणाचा कार्यक्रम केंद्राच्या भात पैदास विभाग, उद्यानविद्या विभाग, विश्रामगृहासमोरील परिसर, मॉडेल कृषी विद्या विभागात जवळपास ४८० वेगवेगळ्या फळे आणि शोभिवंत प्रकारातील वृक्षांची लागवड केली. केंद्राच्या इतिहासात पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण झाल्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकत होता.

# उरण नौदलाच्या केंद्रीय विद्यालयात अमली पदार्थविरोधी जनजागृती

**उरण : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी सप्ताहनिमित्ताने मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या वतीने काल १ जुलै रोजी एनएडी करंजा येथील नौदलाच्या केंद्रीय विद्यालय व एनसीएस विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



नौदलाच्या एनसीएस व केंद्रीय विद्यालयाच्या शिवाजी ऑडिटोरियममध्ये आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी सप्ताह निमित्ताने जनजागृती कार्यक्रमाप्रसंगी केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य राजेश कुमार आणि एनसीएस विद्यालयच्या प्राचार्या सौ. पायल आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी दोन्ही शाळांचे प्राचार्य, शिक्षक नवनिर्वाचित पोलिस उपनिरीक्षक जयराम पाटील यांच्यासह सुमारे ५५० शालेय विद्यार्थी,विद्यार्थिनी सहभागी झाले होते.मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल काटवानी व दर्शन नाईक यांनी मार्गदर्शन केले.मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांचे शरीरावर आणि आयुष्यावर होणारे दुष्परिणाम, सायबर गुन्हे, महिलांविषयक गुन्हे आणि 'गुड टच व बॅड टच' या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले.तसेच यावेळी अंमली पदार्थांच्या आहारी न जाण्याबाबत आणि समाज नशामुक्त ठेवण्याबाबत सर्व विद्यार्थ्यांना सामुहिक शपथही देण्यात आली.

# स्कूल बस खड्ड्यात; वाहतुकीची कोंडी



**पनवेल : वार्ताहर**

खारघर वसाहतीमधील सेक्टर-७ परिसरात महानगर गॅस कंपनीकडून भूमिगत गॅस वाहिनी टाकण्यासाठी सुरू असलेल्या खोदकामामुळे वाहतूक कोंडी झाली. त्याचवेळी स्कूल बस रस्त्यावरील खड्ड्यात अडकल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

फेज-१ परिसरात महानगर गॅस कंपनीकडून अनेक दिवसांपासून गॅस पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आले असून, काही ठिकाणी खड्डे उघडेच असल्याने नागरिकांना तसेच वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. घटनेदरम्यान शाळेची बस खड्ड्यात अडकल्याने रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या आणि वाहतूक संथ झाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

बसमधील विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. स्थानिक नागरिकांनी संबंधित यंत्रणांकडे वारंवार तक्रारी करूनही रस्त्यांची योग्य दुरुस्ती होत नसल्याचा आरोप केला आहे. तसेच, खोदकाम पूर्ण झाल्यानंतर रस्ते तातडीने पूर्ववत करावेत आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

# संवेदना चॅरिटेबल संस्थेमार्फत धामणी येथे विद्यार्थ्यांना स्कूल बॅग्जचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संवेदना चॅरिटेबल संस्थेमार्फत मागील १४ वर्षांपासून विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमांतर्गत दिनांक २७ जून रोजी ज्ञानाई माध्यमिक शाळा, धामणी (आदिवासी पाडा) येथे एकूण १६३ स्कूल बॅग्सचे वाटप करण्यात आले. तसेच मनःशक्ती केंद्राच्या सहकार्याने “अभ्यास यशाचे विज्ञान” या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी छाया पाटील यांनी विद्यार्थ्यांना ताणमुक्त अभ्यास, एकाग्रता वाढविणे व यशामागील वैज्ञानिक दृष्टिकोन याबाबत मार्गदर्शन केले.



# अभिनेत्री अक्षता तांडेलला उत्कृष्ट अभिनय गुणवत्ता पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रंगभूमीवरील प्रभावी अभिनयाची दखल घेत अभिनेत्री अक्षता तांडेल यांना ६४व्या महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य महोत्सवात उत्कृष्ट अभिनय गुणवत्ता पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिर येथे सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित विभागीय पारितोषिक वितरण समारंभात विविध नाट्यसंस्था, दिग्दर्शक आणि कलाकारांचा गौरव करण्यात आला.




याच सोहळ्यात मोरया कलामंच प्रस्तुत 'ब्लॅक होल' या नाटकातील प्रभावी भूमिकेसाठी अक्षता तांडेल यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या यशामुळे मोरया कलामंच या संस्थेच्या कलात्मक प्रवासाला आणखी एक मानाचा मुकुट मिळाला आहे. अक्षता तांडेलच्या या यशाबद्दल नाट्यसृष्टीतील मान्यवर, सहकलाकार, मित्रपरिवार आणि चाहत्यांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# पनवेल-सीएसएमटी लोकलमध्ये मद्यधुंद प्रवाशाचा धिंगाणा

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई उपनगरीय रेल्वेतील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पनवेलहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी)कडे जाणाऱ्या लोकलमध्ये मद्यधुंद अवस्थेतील एका प्रवाशाने धिंगाणा घालत सहप्रवाशांना शिवीगाळ केली. एवढेच नव्हे तर, मी चार खून केले आहेत, पुढचा नंबर तुझा आहे, अशी धमकी दिल्याने डब्यात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. प्रवाशांनी प्रसंगावधान राखत



परिस्थिती नियंत्रणात आणली असली, तरी काही दिवसांपूर्वीच बोरिवली लोकलमध्ये झालेल्या प्रवाशाच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर या प्रकारामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबतची चिंता पुन्हा ऐरणीवर आली आहे.

या घटनेचा व्हिडीओ सध्या समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. उपलब्ध माहितीनुसार, संबंधित व्यक्ती लोकलच्या डब्यात मोठमोठ्याने आरडाओरडा करत होती. सुरुवातीला प्रवाशांनी त्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याने अश्लील शिवीगाळ करत सहप्रवाशांना धमकावण्यास सुरुवात केली. काही प्रवाशांनी त्याला शांत राहण्यास सांगितले असता तो अधिकच आक्रमक झाला. काही प्रवाशांनी त्याच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न केला, तर काहींनी धाडस दाखवत त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. अखेर प्रवाशांच्या सामूहिक हस्तक्षेपामुळे परिस्थिती नियंत्रणात आली आणि संभाव्य अनर्थ टळला. या घटनेत कोणालाही दुखापत झाल्याची माहिती समोर आलेली नाही.

मात्र,संपूर्ण प्रकाराचा व्हिडीओ काही प्रवाशांनी मोबाईलमध्ये चित्रीत केला असून तो समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहे. संबंधित व्यक्तीला रेल्वे पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आले आहे का किंवा त्याच्याविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, याबाबत अधिकृत माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाही.

# कमळ महिला नागरी सहकारी पतपेढीचा १२ टक्के लाभांश जाहीर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता सभासदांच्या भागभांडवलावर १२% लाभांश जाहीर करण्यात आला असून उपस्थित सभासदांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्याचे स्वागत केले.

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल यांच्या ३१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन ज्येष्ठ नागरिक सभागृह, ठाणानाका, पनवेल येथे संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती मालती चंद्रकांत आंग्रे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.अध्यक्षा श्रीमती मालती आंग्रे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी सांगितले की संस्थेचे भागभांडवल, ठेवी, कर्जवाटप व नफा यामध्ये उल्लेखनीय वाढ झाली आहे. संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रगतीचे श्रेय त्यांनी संस्थेचे तज्ञ संचालक श्री. बांदोडकर साहेब, सभासद, संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांना दिले.

संस्थेचे संस्थापक तथा तज्ञ संचालक शशिकांत बांदोडकर यांनी उपस्थित सभासदांना मार्गदर्शन करताना संस्थेच्या आर्थिक वाटचालीचा आढावा घेतला. संस्थेने चालू आर्थिक वर्षात उल्लेखनीय नफा कमावल्यामुळे सभासदांना १२% लाभांश जाहीर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच संस्थेच्या प्रगतीसाठी सभासदांचे सहकार्य भविष्यातही आवश्यक असल्याचे नमूद केले.

सभेच्या शेवटी इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या सभासदांच्या पाल्यांचा स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.यावेळी उपाध्यक्षा सौ. पूर्वा खेडेकर, संचालिका सौ. पूनम बांदोडकर, श्रीमती चित्रा मानकामे, उर्मिला वंजारी, मनीषा विसपूते, निर्मला म्हात्रे, अर्चना गायकवाड, ॲड. वृंदा बाबरे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष ठोंबरे, प्रशासकीय व्यवस्थापक दिपक राजे, सिनिअर मॅनेजर. अशोक जरे, नवीन पनवेल शाखेच्या अधिकारी सुजाता रणदिवे, वसुली अधिकारी सुनिल गद्रे, सिनिअर सुपरवायझर जयंता शेलार तसेच मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिकेत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाचा आढावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्याच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाचे मा. अतिरिक्त अभियान संचालक, मुंबई डॉ. जगन्नाथ विरकर तसेच सहाय्यक संचालक (NUHM) डॉ. दिप्ती देशमुख यांनी नुकतीच पनवेल महानगरपालिकेस भेट देऊन राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्य कार्यक्रम व योजनांचा सविस्तर आढावा घेतला.

या भेटी दरम्यान आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. तसेच आरोग्य संस्थास्तरावरील जनआरोग्य समिती, महिला आरोग्य समिती आणि महानगरपालिका स्तरावरील एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती यांच्या गठनाबाबत माहिती घेऊन समित्यांच्या बैठका नियमित आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

आढावा बैठकीत उपस्थित अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे व उपायुक्त (आरोग्य) प्रसेनजीत कारलेकर यांच्यासोबत भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून पनवेल महानगरपालिका क्षेत्रात अतिरिक्त आरोग्य केंद्रांसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली. यासाठी सिडको प्रशासनास प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. यासोबतच आयुष्मान भारत डिजिटल मिशन, माता व बाल आरोग्य, राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम, राष्ट्रीय कुष्ठरोग निवारण कार्यक्रम, राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम, कायाकल्प तसेच एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम आदी विविध आरोग्य योजनांचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. पनवेल महानगरपालिकेमार्फत वैद्यकीय आरोग्य क्षेत्रात राबविण्यात येणारे विविध उपक्रम व नव्याने प्रस्तावित कामांचे सादरीकरण करण्यात आले. या कामांची दखल घेत मा. अतिरिक्त अभियान संचालक, मुंबई यांनी पनवेल महानगरपालिकेच्या कार्याचे कौतुक केले. सदर आढावा बैठकीस पनवेल महानगरपालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. गणेश नायर, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड, शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. भूषण चव्हाण, वैद्यकीय अधिकारी डॉ. मनीषा चांदक, डॉ. सुरेश पंडित, डॉ. अनमोल ठाकूर, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक डॉ. आकांक्षा हणगे, एपिडेमियोलॉजिस्ट डॉ. आकाश उसाळे तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

# कामोठे वसाहतीमध्ये पानमसाला, तंबाखू जप्त; दुकानदारांना अटक

**पनवेल :** बंदी घालण्यात आलेला पानमसाला व सुगंधी तंबाखू विक्री करणाऱ्या कामोठे येथील दोन पानटपऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन तसेच कामोठे पोलिसांनी संयुक्त कारवाई करून २,९६८ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त केला. या प्रकरणी दोन दुकानदारांविरोधात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.

अन्नसुरक्षा अधिकारी प्रियांका अडाले यांच्या फिर्यादीवरून वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली खांदेश्वर रेल्वे स्थानकासमोरील 'रघुवीर पान शॉप' आणि 'जय श्री श्याम पान' येथे धाडसत्राची कारवाई करण्यात आली.

# पनवेल महानगरपालिकेतील शहर अभियंता संजय कटेकर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र नागरी सेवा शर्ती, १९८२ नुसार नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या पनवेल महानगरपालिकेचे शहर अभियंते संजय कटेकर यांच्यासह चार अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्तीनिमित्त गौरव व सत्कार समारंभ आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे उत्साहात संपन्न झाला.

सन्मानित सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये शहर अभियंता संजय बारका कटेकर, कार्यकारी अभियंता सुधीर विश्वासराव साळुंखे, हवालदार/नाईक मनोज गणपत गायकवाड तसेच बांधकाम विभाग मजूर सुरेश बाळकृष्ण गायकर यांचा समावेश होता. तसेच नगर



रचना विभागाचे अभियंता नितीन हुद्दार यांचादेखील स्वेच्छानिवृत्ती निमित्त सन्मान करण्यात आला.

यावेळी पनवेलचे महापौर नितीन पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, पनवेल स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक, नगरसेविका, माजी आयुक्त सुधाकर देशमुख, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, महापालिका अधिकारी यांच्या उपस्थितीत सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती उपदानाचे तसेच सेवानिवृत्तीविषयक लाभांचे धनादेश प्रदान करून सेवाकार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे यांनी सर्व सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांचा विशेष वैयक्तिक सन्मान केला. तसेच यावेळी मनोगतात पनवेलच्या विकासातील सन्मानितांचे योगदान स्पष्ट केले व पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. महापौर नितीन पाटील यांनी सन्मानितांचा 'अनुभवसंपन्न व कामासाठी झोकून दिलेली माणसे' असा गौरव करत आयुष्याच्या पुढील टप्प्यासाठी शुभेच्छा दिल्या.

माजी शहर अभियंता संजय कटेकर यांनी आपल्या मनोगतात नगरपालिका असल्यापासून पनवेलच्या विकासाचा साक्षीदार असल्याचे नमूद केले. अनेक महत्वपूर्ण प्रकल्पांमध्ये काम करण्याची संधी प्राप्त झाल्यामुळे स्वतःला नशीबवान म्हणत सर्व आजी माजी लोकप्रतिनिधी, अधिकारी व पनवेलची जनता यांचा ऋणी असल्याची भावना व्यक्त केल्या.

# मतदार विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमासंदर्भात आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदान विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) अंतर्गत पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली आज (दि. १ जुलै) महानगरपालिका मुख्यालयातील बैठक कक्षात महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीस मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पवन चांडक, सहाय्यक



मतदार नोंदणी अधिकारी,उपायुक्त नानासाहेब कामठे, ,संभाजी शेलार, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त स्वरूप खारगे, समीर वाठारकर, रमेश चव्हाण, मिनल भामरे महापालिका व महसूल अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच इतर सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत एसआयर प्रक्रियेच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त मंगेश चितळे यांनी बिएलओ प्रशिक्षण ॲपवर उपस्थिती नोंदविणे, रविवारी आयोजित शिबिराच्या तयारीचा आढावा, एइआरओ कार्यालयाची स्थापना, प्रलंबित BLO नियुक्ती, तसेच नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ECINet लॉगिन तयार करण्याची कार्यवाही संदर्भात आढावा घेण्यात आला.

याशिवाय शिबिराच्या प्रचार व प्रसिद्धीची तयारी, सहायक व स्वयंसेवकांची नियुक्ती, तांत्रिक प्रशिक्षणाचे नियोजन व आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीचाही आढावा घेण्यात आला. ही बैठक एसआयआर कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी सांगितले.

पनवेल विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्राच्या ठिकाणी रविवार दिनांक ५ जुलै रोजी नागरिकांच्या सोयीसाठी विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात नागरिकांनी सहभागी व्हावे व आपले एन्युमरेशन फॉर्म भरून घेण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# कळंबोली गावात झाड कोसळून घराचे नुकसान

**कळंबोली: बातमीदार**

कळंबोली परिसरात संततधार कोसळणाऱ्या पावसामुळे एक ७० ते ७५ वर्षांचे वड व पिंपळाचे झाड कोसळून घराचे व घरातील सामानाचे मोठे नुकसान झाले आहे. त्याचा पंचनामा करण्यास शासनाचे किंवा प्रशासनाचे कोणी फिरकले नसल्याची खंत भाजपाचे कळंबोली मंडळातील मंडळ उपाध्यक्ष संदीप भगत यांनी व्यक्त केली आहे.

मात्र कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील यांनी याबाबत फोनवर माहिती घेऊन पडलेल्या झाडाची छाटणी करण्याबाबत माणसे पाठवून मदत केली असल्याचे त्यांनी सांगितले.

मंगळवारी दुपारपासून



पडणाऱ्या सतत पावसाच्या संतत धार मुळे कळंबोली गावातील रहिवाशी सुनील भगत यांच्या असलेल्या चाळीवर जवळच असलेले झाड दुपारी तीन वाजता कोसळले. यामध्ये एका खोलीचे प्रचंड नुकसान झाले आहे. जर ते झाड पूर्ण खोलीवर पडले असेल तर मोठी जीवित हानी झाली असती परंतु सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नसल्याचे यावेळी सांगण्यात आले.तसेच झाड कोसळलेल्या खोलीमधील टीव्ही फ्रिज अन्य किंमती सामानाचे नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले आहे.

याची माहिती अग्निशामक दल व अन्य प्रशासन यंत्रणाना ही दिली असल्याचे कळंबोलीतील भाजपाचे मंडल उपाध्यक्ष संदीप भगत यांनी सांगितले आहे. झाड कोसळून घराची पडझड होणे व घरातील किमती वस्तूंचे झाले आहे.

तरीही शासनाच्या वतीने पंचनामा करणे क्रम प्राप्त असून सुद्धा पाहणी करण्यासाठी सुद्धा कोणी आले नसल्याने संताप यावेळी संदीप भगत यांनी व्यक्त केला आहे.

# डॉक्टर्स डेचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी विशेष करिअर मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भागात शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात १ जुलै रोजी डॉक्टर्स डे चे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी विशेष करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी टाटा हॉस्पिटल मधीलअनुभवी डॉक्टर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

या मार्गदर्शन सत्रामध्ये डॉक्टरांनी वैद्यकीय व्यवसायाचा प्रवास, डॉक्टर होण्यासाठीआवश्यक असलेले शिक्षण, NEET परीक्षेचे महत्व , MBBS तसेच इतर वैद्यकीय क्षेत्रातीलआव्हाने आणि करियरच्या विविध संधी याविषयी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना सविस्तरमाहिती दिली. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थी आपला जास्तीत जास्त वेळ सोशलमीडियावर घालवतात, त्यापासून अलिप्त राहून आपल्या करिअरवर कसं फोकस करायचंयाबद्दल त्यांनी मार्गदर्शन



केलं.

त्यांनी डॉक्टर हा केवळ व्यवसाय नसून समाजसेवेचे एकश्रेष्ठ माध्यम आहे. त्याच बरोबर त्यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, सेवाभाव , शिस्त आणिसातत्यपूर्ण परिश्रम यांचे महत्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारून आपल्याशंकांचे निरसन करून घेतले. डॉक्टरांनी अभ्यासाचे नियोजन ,स्पर्धा परीक्षांची तयारी, वेळेचे व्यवस्थापन आणि वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये या विषयीमार्गदर्शन केले .

या प्रेरणादायी मार्गदर्शन सत्रामुळे विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्राची वास्तवदर्शी ओळखमिळाली तसेच डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी आत्मविश्वास आणि प्रेरणा मिळाली आहे . या मार्गदर्शन सत्राचे आयोजन केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी प्राचार्या निशा नायरयांचे आभार व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त आणि ज्ञानवर्धकअसल्याची भावना व्यक्त केली.

## संपादकीय

# दिलासा देणारा निर्णय

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयात जन्मसिद्ध नागरिकत्वाच्या तत्त्वाला कायम ठेवले आहे. अमेरिकेच्या संविधानातील चौदाव्या दुरुस्तीच्या आधारे अमेरिकेत जन्मलेल्या प्रत्येक बालकाला नागरिकत्वाचा अधिकार मिळतो. ही अनेक दशकांची परंपरा या निर्णयामुळे अबाधित राहिली आहे. हा निर्णय केवळ कायदेशीर किंवा घटनात्मक नसून अमेरिकेतील विविध स्थलांतरित समुदायांसाठी दिलासा देणारा आहे. विशेषतः भारतीय-अमेरिकन समाजासाठी त्याचे महत्त्व अधिक आहे.

**अमेरिकेत आज भारतीय वंशाचे सुमारे ५० लाखांहून अधिक लोक वास्तव्यास आहेत. माहिती-तंत्रज्ञान, वैद्यकीय सेवा, शिक्षण, संशोधन आणि उद्योग अशा अनेक क्षेत्रांत भारतीय-अमेरिकनांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. यातील मोठा वर्ग हा स्थलांतरितांचा किंवा स्थलांतरितांच्या पुढील पिढ्यांचा आहे. त्यामुळे जन्मसिद्ध नागरिकत्वाचा प्रश्न त्यांच्यासाठी केवळ कायदेशीर नसून सामाजिक आणि भावनिकदृष्ट्याही महत्त्वाचा आहे. अमेरिकेत कामासाठी किंवा उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या अनेक भारतीय कुटुंबांची मुले अमेरिकेत जन्माला येतात. जन्मसिद्ध नागरिकत्वाच्या तत्त्वामुळे या मुलांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळते आणि त्यांना शिक्षण, रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि नागरी हक्कांच्या दृष्टीने स्थैर्य लाभते. या व्यवस्थेमुळे स्थलांतरित कुटुंबांना भविष्यासंबंधी निश्चितता मिळते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने ही निश्चितता कायम राहिली आहे. या वादाची पार्श्वभूमी समजून घेणे महत्त्वाचे आहे. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या नव्या कार्यकाळाच्या पहिल्याच दिवशी जन्मसिद्ध नागरिकत्वाच्या विद्यमान व्याख्येवर मर्यादा आणण्याच्या उद्देशाने एक कार्यकारी आदेश जारी केला होता. या आदेशानुसार अमेरिकेत जन्मलेल्या प्रत्येक बालकाला आपोआप नागरिकत्व देण्याच्या प्रथेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते, विशेषतः ज्या पालकांचा अमेरिकेत कायदेशीर कायमस्वरूपी दर्जा नाही अशा प्रकरणांबाबत. ट्रम्प प्रशासनाने हा निर्णय बेकायदेशीर स्थलांतराला आळा घालण्यासाठी आवश्यक असल्याचे म्हटले होते. मात्र विविध राज्य सरकारे, नागरी हक्क संघटना आणि स्थलांतरित समुदायांनी या आदेशाला न्यायालयात आव्हान दिले. त्यांच्या मते हा आदेश अमेरिकेच्या संविधानातील चौदाव्या दुरुस्तीच्या भावनेशी विसंगत होता. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयामुळे जन्मसिद्ध नागरिकत्वाचा घटनात्मक आधार कायम राहिला असून या विषयावर दीर्घकाळ चाललेल्या कायदेशीर आणि राजकीय वादाला नवे वळण मिळाले आहे. जन्मसिद्ध नागरिकत्वासारख्या घटनात्मक संरक्षणामुळे भारतीय-अमेरिकन समाजातील नव्या पिढ्यांचा अमेरिकन लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होतो. नागरिकत्वाबाबत अनिश्चितता निर्माण झाली असती, तर त्याचा परिणाम लाखो कुटुंबांच्या मानसिकतेवर आणि दीर्घकालीन नियोजनावर झाला असता. केवळ भारतीय समुदायाच्या हिताच्या चष्म्यातून या निर्णयाकडे पाहणे योग्य ठरणार नाही. अमेरिकेची ताकद ही विविधतेत आणि स्थलांतरितांचे स्वागत करणाऱ्या परंपरेत आहे. जन्मसिद्ध नागरिकत्व हे त्या परंपरेचे महत्त्वाचे प्रतीक मानले जाते. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा घटनात्मक मूल्ये, समानता आणि कायद्याचे राज्य या तत्त्वांनाही बळ देणारा आहे. भारतीय-अमेरिकन समाजासाठी हा निर्णय दिलासादायक असला तरी त्याचबरोबर स्थलांतर धोरण आणि कायमस्वरूपी वास्तव्यासंबंधीचे प्रश्न अद्याप कायम आहेत. त्यामुळे अमेरिकेतील भारतीय समुदायाने या निर्णयाचे स्वागत करतानाच व्यापक स्थलांतर सुधारणांबाबतही सकारात्मक संवाद सुरू ठेवणे आवश्यक आहे. एकंदरीत अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय भारतीय-अमेरिकन समाजासाठी स्थैर्य, विश्वास आणि संधी यांचे प्रतीक ठरतो. अमेरिकन स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या हजारो भारतीय कुटुंबांसाठी तो आश्वासक आणि महत्त्वपूर्ण मानला जाईल.**

# कौशल्ये बजावतात महत्त्वाची भूमिका



आजच्या स्पर्धात्मक युगात यशस्वी होण्यासाठी केवळ पदवी पुरेशी नसते, तर त्यासोबत विविध कौशल्यांची जोड आवश्यक असते. कोणत्याही क्षेत्रात स्वतःचे वेगळेपण सिद्ध करण्यासाठी कौशल्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. कौशल्ये म्हणजे अशी क्षमता, जी आपल्याला आपले काम सहज, योग्य आणि प्रभावीपणे पूर्ण करण्यास सक्षम करते. प्रत्येक व्यक्तीकडे काही ना काही कौशल्ये असतात, ज्यामुळे त्याची स्वतःची ओळख निर्माण होते. परंतु, कामाच्या ठिकाणी यशस्वी होण्यासाठी काही विशिष्ट कौशल्ये अत्यंत आवश्यक ठरतात. या लेखात अशाच काही महत्त्वाच्या कौशल्यांचा सविस्तर आढावा मी घेतला आहे.

'संवाद कौशल्य' हे यशस्वी कामगिरीचा पाया आहे. प्रभावी संवादामुळे सहकारी, वरिष्ठ, ग्राहक किंवा मित्रमैत्रिणींशी सकारात्मक संबंध निर्माण होतात आणि कामातील अडचणी दूर होतात. चांगला संवाद साधण्यासाठी दुसऱ्याचे म्हणणे बारकाईने ऐकणे, आपले विचार स्पष्ट आणि संक्षिप्तपणे मांडणे, आत्मविश्वासाने बोलणे, सकारात्मक शब्दांचा वापर करणे आणि समोरच्या व्यक्तीच्या दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक आहे. मित्र, कुटुंब आणि सहकाऱ्यांशी नियमित संभाषणाचा सराव केल्यास संवाद कौशल्य सुधारते, ज्याचा कामावर सकारात्मक परिणाम होतो.

'वेळेचे व्यवस्थापन' – कोणतेही काम, मग ते छोटे असो वा मोठे, वेळेचे योग्य नियोजन आणि पालन करणे आवश्यक आहे. वेळेची कदर करणारी व्यक्ती नेहमीच विश्वासार्ह ठरते. कामाचे प्राधान्य ठरवून नियोजन करणे, ठरलेल्या वेळेच्या किमान एक तास आधी तयारी करणे आणि अनावश्यक गोष्टींमुळे वेळ वाया घालवणे टाळणे या बाबी वेळेचे व्यवस्थापन सुधारण्यास मदत करतात. यामुळे कामाची कार्यक्षमता वाढते आणि विश्वासार्हता निर्माण होते.

'समस्या सोडवण्याची क्षमता' हे आणखी एक महत्त्वाचे कौशल्य आहे. कामाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणी स्वतःहून सोडवण्याचा प्रयत्न करणे आणि नवीन उपाययोजना सुचवणे यामुळे आपली सर्जनशीलता आणि कार्यक्षमता दिसून येते. समस्येचे मूळ शोधून त्यावर उपाय शोधणे, सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आणि सहकाऱ्यांशी चर्चा करून उपाय शोधणे या गोष्टी या कौशल्याचा भाग आहेत. यामुळे कामाच्या ठिकाणी आपले योगदान अधिक प्रभावी ठरते.

'तांत्रिक कौशल्ये' आजच्या डिजिटल युगात अनिवार्य ठरली आहेत. आपण ज्या क्षेत्रात काम करतो, त्या क्षेत्रातील मूलभूत तांत्रिक ज्ञान असणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, संगणकाचे मूलभूत ज्ञान, सॉफ्टवेअर हाताळणी, डेटा विश्लेषण आणि इंटरनेटचा वापर यांचा समावेश होतो. तसेच, क्षेत्र-विशिष्ट तंत्रज्ञान किंवा साधनांचे ज्ञान, जसे की प्रोग्रामिंग, डिझायनिंग किंवा डेटा मॅनेजमेंट, यामुळे आपण कामात प्रगती करू शकतो आणि नवीन संधी मिळवू शकतो.

'प्रभावी लेखन आणि वाचन' ही कौशल्ये कामाच्या ठिकाणी तितकीच महत्त्वाची आहेत. स्पष्ट आणि व्यावसायिक लेखनामुळे आपले विचार व्यवस्थित मांडता येतात, तर चांगले वाचन नवीन माहिती आत्मसात करण्यास मदत करते. अचूक आणि व्याकरणदृष्ट्या बरोबर लेखन करणे आणि कामाशी संबंधित दस्तऐवज किंवा माहिती नीट समजून घेणे यामुळे कामाची गुणवत्ता वाढते.

'संघकामगिरी (टीमवर्क)' हे यशस्वी कामगिरीचे महत्त्वाचे सूत्र आहे. समंजसपणे आणि सहकार्याच्या भावनेने काम केल्यास मोठी कामे सहज पूर्ण होतात. सहकाऱ्यांना मदत करणे, त्यांच्या मतांचा आदर करणे आणि संघाचे ध्येय साध्य करण्यासाठी योगदान देणे या बाबी संघकामगिरीला बळकटी देतात. यामुळे कामाचे वातावरण सकारात्मक राहते आणि उत्पादकता वाढते.

'नैतिक मूल्ये आणि प्रामाणिकपणा' राखणे कामाच्या ठिकाणी अत्यंत गरजेचे आहे. नियमांचे काटेकोरपणे पालन करणे, जबाबदारी स्वीकारणे, चुका मान्य करणे आणि पारदर्शक व प्रामाणिक वर्तन ठेवणे यामुळे आपली विश्वासार्हता वाढते आणि दीर्घकालीन यश मिळते. प्रामाणिक व्यक्ती नेहमीच विश्वासार्ह ठरते आणि त्याला कामाच्या ठिकाणी आदर मिळतो.

'आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता' हे कौशल्य यशस्वी करिअरसाठी आवश्यक आहे. स्वतःवर विश्वास ठेवून निर्णय घेण्याची क्षमता असावी आणि चुका झाल्यास त्यातून शिकण्याची वृत्ती ठेवावी. आत्मविश्वासामुळे आव्हानांना सामोरे जाण्याची हिंमत मिळते, स्वतःच्या क्षमतांवर विश्वास वाढतो आणि स्वतंत्रपणे काम करण्याची क्षमता विकसित होते.

'सतत शिकण्याची वृत्ती' ही आजच्या बदलत्या काळात अत्यंत महत्त्वाची आहे. तंत्रज्ञान आणि कामाच्या पद्धती सतत बदलत असतात, त्यामुळे जिज्ञासू वृत्ती ठेवून नवीन गोष्टी शिकणे आवश्यक आहे. नवीन कौशल्ये शिकण्यासाठी प्रशिक्षण घेणे, उद्योगातील नवीन घडामोडींशी अद्ययावत राहणे आणि संशोधन वृत्ती ठेवून नवीन माहिती मिळवणे यामुळे कामात प्रगती होते.

'सृजनशीलता आणि अनुकूलता' ही कौशल्ये कामात नाविन्य आणण्यासाठी महत्त्वाची आहेत. नवीन आणि नाविन्यपूर्ण कल्पना मांडणे, बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे आणि कामात सर्जनशीलता आणणे यामुळे आपण इतरांपेक्षा वेगळे ठरतो. सृजनशील व्यक्ती नेहमीच नवीन संधी निर्माण करू शकते.

'भावनिक बुद्धिमत्ता' म्हणजे स्वतःच्या आणि इतरांच्या भावना समजून घेण्याची आणि त्यांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता. यामुळे सहकाऱ्यांशी सकारात्मक संबंध निर्माण होतात, तणावपूर्ण परिस्थितीत शांत राहता येते आणि संघर्षांचे निराकरण प्रभावीपणे करता येते. भावनिक बुद्धिमत्ता कामाच्या ठिकाणी सकारात्मक वातावरण निर्माण करते.


'नेटवर्किंग कौशल्य' हे व्यावसायिक संबंध निर्माण करण्यासाठी आणि नवीन संधी मिळवण्यासाठी उपयुक्त ठरते. उद्योगातील लोकांशी संपर्क साधणे, व्यावसायिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे आणि सामाजिक व्यासपीठांचा योग्य वापर करणे यामुळे करिअरच्या नवीन संधी उपलब्ध होतात.

कामाच्या ठिकाणी यशस्वी होण्यासाठी संवाद कौशल्य, वेळेचे व्यवस्थापन, तांत्रिक ज्ञान, संघकामगिरी, नैतिक मूल्ये, आत्मविश्वास, सृजनशीलता, भावनिक बुद्धिमत्ता, सतत शिकण्याची वृत्ती आणि नेटवर्किंग कौशल्ये अत्यंत आवश्यक आहेत. ही कौशल्ये आत्मसात केल्यास आपण आपल्या करिअरमध्ये यशस्वी होऊ शकतो आणि समाजात चांगले स्थान मिळवू शकतो. प्रत्येकाकडे काही ना काही कौशल्य असते, परंतु ते वेळीच ओळखून त्यावर मेहनत घेणे गरजेचे आहे. सध्याच्या बाजारपेठेत कौशल्य असलेल्या व्यक्तींना मोठ्या संधी उपलब्ध होतात. म्हणूनच या कौशल्यांचा विकास करून आपण आपल्या करिअरला नवी उंची देऊ शकतो.

**-समीक्षा चव्हाण**

मु.पो. तारळे, ता. पाटण, जि. सातारा

# स्वातंत्र्यसैनिक युसूफ मेहर अली



निमित्त

युसूफ मेहर अली यांचे मूळ नाव युसूफ झफर मर्चंट हे भारतीय स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांचे कुटुंब मूळ गुजरातच्या कच्छ भागातील होते. मेहरअली यांच्या आजोबांचा मुंबईमध्ये कापडाचा व्यवसाय होता. कॉलेजमध्ये असताना ते बॉम्बे प्रेसीडेंसी युथ लिग संघटनेत सामील झाले. ते सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक सदस्यापैकी एक होते. त्यांनी १९४२च्या चले जाव आंदोलनात महत्त्वाची भूमिका राबवली होती. 'चले जाव' ही घोषणादेखील त्यांनीच दिली होती.

त्यांचे खोजा मुस्लिम कुटुंब मूळचे गुजरातच्या कच्छ संस्थानातील. त्यांचे वडील व्यापारानिमित्त मुंबई व कलकत्ता या शहरांत राहत. यूसुफ यांचा जन्म मुंबईत झाला पण त्यांचे प्राथमिक शिक्षण कलकत्यात झाले. नंतर त्यांनी सर्व शिक्षण मुंबईतच घेतले. विद्यार्थि दशेतच रस्पूट्यीन क्लब नावाची युवक संघटना मिनू मसानी, उपेंद्र देसाई, के एफ. नरिमन आदी मित्रांच्या साह्याने त्यांनी स्थापन केली. एल्फिन्स्टन महाविद्यालयातून त्यांनी पदवी घेतली (१९२५). त्यानंतर ते एलएलबी झाले पण त्यांच्या युवक चळवळीमुळे त्यांना वकिलीची सनद नाकारण्यात आली. तेव्हा त्यांनी बॉम्बे यूथलीगची स्थापना केली पुढे तिचेच रूपांतर बॉम्बे प्रसिडेन्सी यूथ लीगमध्ये झाले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्त्वांवर यूथ लीगची श्रद्धा होती. लीगच्या निवडक चारशे स्वयंसेवकांनी मेहरअलींच्या नेतृत्वाखाली मुंबई बंदरात सायमन कमिशनविरुद्ध निदर्शने केली. त्यात मेहरअलींना मार बसला. १९२९ मध्ये त्यांनी लष्कराच्या धर्तीवर नॅशनल मिलिशा संघटना स्थापन केली. या संघटनेचे ध्येय लोकांना शिक्षित करून स्वातंत्र्याची जाणीव करून द्यावयाची आणि नंतर त्यांना कृतीसाठी उद्युक्त करावयाचे, हे होते. बार्डोलीचा साराबंदी सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह आदींतून त्यांनी सक्रिय भाग घेतला. महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीनंतर त्यांनी स्वदेशी वस्तूंचा सर्वत्र प्रसार केला आणि मुंबईत स्वदेशी वस्तू विकल्या. या सुमारास व्हॅनगार्ड या नियतकालिकाचे संपादकपद त्यांच्याकडे आले. यात त्यांनी महात्मा गांधींची परखड मुलाखत छापली. परिणामतः ते नियतकालिक बंद पडले व मेहरअलींना शिक्षा झाली. १९३८ मध्ये त्यांनी यूरोप-अमेरिका खंडांचा सदिच्छा दौरा करून तेथील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला. त्यांना वैयक्तिक सत्याग्रहासाठी पुन्हा अटक झाली (१९४०). ते तुरुंगात असतानाच त्यांची मुंबई महापालिकेच्या महापौरपदी निवड झाली (१९४१). मुंबईच्या कामगारांना संघटित केले.यामुळे ब्रिटिश सरकारला गुमास्ता कायदा करणे भाग पडले. १९४२ मध्ये त्यांनी छोडो भारत आंदोलनात भाग घेतला. भूमिगत राहून त्यांना जनजागृती करावयाची होती पण ते सापडले व त्यांना शिक्षा झाली. तुरुंगातील वातावरणात त्यांची प्रकृती अधिक क्षीण झाली. पुढे उपचारार्थ ते अमेरिकेला गेले (१९४७) पण फारसा उपयोग झाला नाही. अखेर ऐन उमेदीतच ते मुंबई येथे मरण पावले. २ जुलै १९५० रोजी वयाच्या ४७ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. पनवेल येथील तारा येथे त्यांच्या नावे युसूफ मेहेर अली सेंटर चालवले जाते. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# प्रेशर कुकर वापरताना 'या' गोष्टींची घ्या काळजी

कुकर शिट्टी वाजवत नाही यामागे अनेक कारणे असू शकतात. एक सामान्य कारण म्हणजे प्रेशर रिलीज व्हॉल्व्ह किंवा कुकरवर शिट्टी लावणारा भाग ब्लॉक झालेला असतो. जेव्हा वाफेचा रस्ता ब्लॉक केला जातो, तेव्हा आतील दाब वाढत राहतो परंतु बाहेर पडू शकत नाही, ज्यामुळे कुकर फुटू शकतो. अशा परिस्थितीत, गॅस ताबडतोब बंद करणे आणि कुकर थंड होऊ देणे सर्वात महत्वाचे आहे. कुकर थंड करण्यासाठी, तो काढून बाजूला ठेवा आणि कोणत्याही परिस्थितीत जबरदस्तीने शिट्टी काढण्याचा प्रयत्न करू नका.




जर कुकरमध्ये जास्त पाणी किंवा अन्न भरले तर, दाब योग्यरित्या तयार न झाल्यामुळे शिट्टी वाजत नाही. म्हणून, कुकरची कमाल मर्यादा नेहमी लक्षात ठेवा आणि ती जास्त भरू नका. कुकरमध्ये योग्य प्रमाणात पाणी आणि पुरेशी जागा असावी जेणेकरून वाफ तयार होईल आणि ती शिट्टीद्वारे बाहेर पडेल.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे रबर गॅस्केट किंवा सील खराब होणे. जर ते सैल किंवा फाटलेले असेल तर कुकर व्यवस्थित बंद होत नाही आणि प्रेशर लीक होतो. यामुळे शिट्टी वाजत नाही आणि अन्न व्यवस्थित शिजत नाही. म्हणून, कुकरचे रबर सील, शिट्टी आणि सेफ्टी व्हॉल्व्ह वेळोवेळी तपासले पाहिजेत. वापरल्यानंतर, ते पूर्णपणे स्वच्छ करा आणि कोरडे ठेवा जेणेकरून घाण किंवा गंज टाळता येईल.

जर तुम्हाला वाटत असेल की कुकर खूप गरम झाला आहे पण शिट्टी अजूनही वाजत नाही, तर तो ताबडतोब गॅसवरून काढा. पण तो थंड करण्यासाठी पाण्याखाली ठेवण्याचा प्रयत्न करू नका. यामुळे कुकरमधील दाब अचानक कमी होऊ शकतो आणि झाकण फुटू शकते. योग्य मार्ग म्हणजे तो नैसर्गिकरित्या थंड होऊ देणे आणि नंतर झाकण उघडणे. लक्षात ठेवा, प्रेशर कुकर जितका उपयुक्त आहे तितकीच त्याची वापरताना काळजी न घेतल्यास तो धोकादायक देखील ठरू शकतो. म्हणून जर कुकरची शिट्टी वाजत नसेल, तर घाबरू नका पण निष्काळजीही राहू नका. योग्य पद्धत अवलंबा आणि वेळोवेळी ती तपासत राहा. यामुळे तुमचे कुटुंब आणि तुमचे किचन सुरक्षित राहण्यास मदत होईल.

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# काकडी खाण्याची योग्य वेळ कोणती?

काकडी ही एक हायड्रेटिंग थंडगार भाजी आहे, जी उन्हाळ्याच्या दिवसात खाणं विशेषतः फायदेशीर मानले जाते. आहारतज्ज्ञ दीपलक्ष्मी यांच्या मते, सकाळी किंवा मध्यरात्री काकडी खाणे खरोखरच फायदेशीर आहे, विशेषतः उष्ण हवामानात.



त्यात पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने द्रवपदार्थ पुन्हा भरण्यास मदत होते आणि त्यातील सौम्य फायबर पचनास मदत करते. चिमूटभर सैंधव मिठासह लावून खाल्ल्याने पोटफुगीचा त्रास असलेल्यांना मदत होऊ शकते आणि चव वाढू शकते, परंतु संयम महत्त्वाचा आहे. जास्त मीठ, अगदी सैंधव मीठदेखील सोडियमचे सेवन वाढवू शकते,

**काकडी खाण्याची योग्य पद्धत**

त्यांनी नमूद केले आहे की, रात्रीच्या जेवणात काकडी पूर्णपणे टाळण्याचे कोणतेही वैज्ञानिक कारण नाही. व्यवस्थित पचन केल्यास काकडी रात्रीच्या जेवणात सुरक्षितपणे समाविष्ट केली जाऊ शकते, असे दीपलक्ष्मी म्हणाल्या.

काकडीचा रायता पारंपरिक आणि पौष्टिक पदार्थ आहे जो हायड्रेशन, फायबर आणि आतड्यांना अनुकूल प्रोबायोटिक्स देतो. पचनासदेखील मदत करते. काकडीचा जास्तीत जास्त फायदा घेण्यासाठी ती पूर्णपणे धुणे, दोन्ही टोके कापणे आणि जर ती सेंद्रिय नसेल तर सोलणे चांगले, जेणेकरून कीटकनाशकांचा धोका कमी होईल. पचनसंवेदनशीलता असलेल्यांना बिया काढून टाकल्यानेदेखील फायदा होऊ शकतो.

**काकडीचे आरोग्यदायी फायदे**

काकडी हे अविश्वसनीयपणे बहुमुखी आहे आणि विविध प्रकारच्या पदार्थांमध्ये त्यांचा समावेश करता येतो. काकडी जेवणात पोत, चव आणि पौष्टिक मूल्य वाढवतात, काकडीमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते, जे पचनक्रियेसाठी आवश्यक असते. तुमच्या आहारात काकडींचा समावेश केल्याने आतड्यांची नियमित हालचाल होते आणि बद्धकोष्ठता टाळण्यास मदत होते. बहुतेक पाणी असल्याने त्यात कॅलरीज खूप कमी असतात, परंतु तृप्तता येते आणि तुम्हाला भूक लागत नाही. दुसरे म्हणजे, त्यात विरघळणारे फायबरचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि ते डिटॉक्सिफाय होतात,

जरी अधिक मानवी संशोधनाची आवश्यकता असली तरी प्राण्यांच्या चाचण्या आणि टेस्ट ट्यूब अभ्यासातून असे दिसून आले आहे की, मधुमेहींना काकडीचा फायदा रक्तातील साखरेची पातळी कमी करून आणि मधुमेहाच्या गुंतागुंत रोखून होऊ शकतो, असे गोयल म्हणाले.

# धुवाँधार पावसामुळे शेतकरी सुखावला



**मुरुड :** मुरुड शहरांसह पंचक्रोशी भागातील परिसरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असले, तरी शेतकऱ्यांसाठी हा पाऊस दिलासादायक ठरला आहे. तालुक्यात तब्बल आज १५१ मिमी तर एकुण ६५६ मिमी पावसाची नोंद मुरूड तहसीलदार कार्यालया करण्यात आली. या धुवाधार पावसामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पावसामुळे खरीप हंगामातील पिकांना मोठा फायदा होणार असून शेतांमध्ये पुरेसा ओलावा निर्माण झाला आहे. अनेक भागांतील विहिरी, तलाव आणि जलसाठे भरण्यास सुरुवात झाल्याने पाण्याची टंचाई दूर होण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

शेतकऱ्यांनी सांगितले की, पावसाअभावी पेरणीनंतर राब वाढीबाबत चिंता होती. मात्र, झालेल्या धुवाधार पावसामुळे राबाना नवसंजीवनी मिळाली आहे.

एकंदरीत, ६५६ मिमी पावसाच्या नोंदीमुळे शेती क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला असून शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.काल व आज मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून जेथे तिथे पाणीच पाणी दिसत आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे लोक फारसे बाहेर पडत नाही. त्यामुळे मुख्य बाजार पेठेमधील गर्दी ओसरली आहे. शेतकरी वृंद शेताच्या कामात व्यस्त झाला आहे. पाऊस सारखा पडत असल्याने नदी, नाले , तलाव व विहिरी भरून गेल्या आहेत.

# दमदार पावसाने शेतीकामांना सुरुवात, पेरणी अंतिम टप्प्यात

**तळा : प्रतिनिधी**

आठ दिवसांपूर्वी पावसाने दमदार सुरुवात केल्यानंतर आता दोन दिवसांच्या विश्रांती नंतर पुन्हा पावसाने दमदार सुरुवात केली आहे . गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे.३० जून रोजी तळा तालुक्यात ९६ मि.मी. पावसाची नोंद झाली असून बळीराजा आता शेतीच्या कामात मग्न झाला असून पेरणीची कामे संपत आली आहेत.

काही भागात शेतकऱ्यांनी उपलब्ध असलेल्या पाण्यावरती राब तयार केले आहेत.हे राब काही कालावधीत तयार होऊन लवकरच लावणी सुरू होईल.सध्या पडत असलेला पाऊस हा शेतीसाठी चांगला आहे.असाच पाऊस पडत राहीला तर नांगरणी चांगल्या पध्दतीने होईल.तसेच रोपेही या पावसामुळे चांगली तयार होतील असा अंदाज व्यक्त करत भातशेतीचे पिक चांगले येईल असे शेतकरी वर्गातून म्हटले जात आहे.

उशीरा सुरू झालेला पाऊस यापुढेही असाच शेतीच्या दृष्टीने चांगला पडू दे असे शेतकरीवर्ग म्हणत आहेत.सध्या शेतीच्या कामांना आधुनिक अवजारांचा,आधुनिक तंत्रज्ञानाचा व दर्जेदार बियाणांचा वापर होताना पहावयास मिळत आहे.



# आनंदो प्रकल्प ; ५९५ विद्यार्थ्यांना केले शैक्षणिक साहित्याचे वाटप

**कर्जत :** समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या सक्षमीकरणासाठी सदैव कार्यरत असलेल्या 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट' या सामाजिक संस्थेच्या वतीने आनंदो प्रकल्पाच्या माध्यमातून कर्जत आणि खालापूर तालुक्यातील गरजू, गरीब, अनाथ, एकल पालकत्व व दुर्लक्षित इयत्ता ९वी ते १२ वीच्या वर्गात शिकणाऱ्या ५९५ विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या वतीने कर्जत – खालापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप समारंभाचे आयोजन रॉयल गार्डनच्या सभागृहात करण्यात आले होते.

# तळा–रोहा रस्त्यातील वृक्ष हटवल्याने वाहतूक कोंडी टळली

**तळा : प्रतिनिधी**

आपत्कालीन व्यवस्थापन तळा, नगरपंचायतने रोहा रस्यावर पावसामुळे २९ जून रोजी पहाटे वृक्ष उन्मळून पडला पण प्रशासनाने तात्काळ बाजूला केल्नी वाहतूक कोंडी झाली नाही.

तहसिल कार्यालयातील कर्मचारी फुलारे यांनी वृक्ष रस्त्यावर पडल्याचे नगरपंचायतीला सूचना देताच नगरपंचायत कर्मचारी व कामगार हिरू पवार,महेश निरगुडकर, सुभाष तळकर,शंकर वाघरे,व लेखा परिक्षक अमोल ढोके हे घटनास्थळी जावून तात्काळ सदर वृक्ष तोडून बाजूला केले व रस्ता मोकळा केला. ज्यामुळे सदर रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरू झाली.

या कर्मचाऱ्यांच्या कार्यतत्परेते मुळे रस्ता तात्काळ मोकळा झाल्याने त्यांचे कौतुक होत आहे.या रस्त्यावरती जर का वृक्ष काढण्यास जास्त वेळ झाला असता तर रस्त्यावर मोठ्याप्रमाणात वाहतुककोंडी झाली असती व नागरिकांना,नोकरवर्गाला, व्यवसायिकांना त्रास सहन करावा लागला असता.





Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**CHANGU KANA THAKUR, ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, NEW PANVEL (EMPOWERED AUTONOMOUS)**

**Plot No. 1, Sector -11, Khanda Colony, New Panvel (W), Dist Ralgad - 410206**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FROM THE ACADEMIC YEAR 2026-27**

**UN-AIDED**

| Sr. No | Cadre | Subject | Total No. of Posts | Post Reserved for |
|---|---|---|---|---|
| 1 | Assistant Professor | English | 01 | OPEN - 01 |
| 2 | Assistant Professor | Information Technology | 13 | SC - 02, ST - 01, DT(A) - 01, NT (8) - 01, OBC - 02, SEBC - 02, EWS -01, OPEN-03. **(Horizontal Reservation - Persons with Disability Total Posts - 01 (A Group - B./LV. 01 Post) Women - 04 Posts & Sportsmen - 01 Posts)** |
| 3 | Assistant Professor | Computer Science | 11 | SC - 01, ST - 01, DT(A) -01, NT (B)-01, OBC - 02, SEBC - 01, EWS -01, OPEN-03. **(Horizontal Reservation - Women - 03 Posts & Sportsmen - 01 Post)** |
| 4 | Assistant Professor | Biotechnology | 08 | SC - 01, ST - 01, DT(A) - 01, OBC-02; SEBC - 01, EWS-01, OPEN-01. **(Horizontal Reservation - Women - 02 Posts)** |
| 5 | Assistant Professor | Accounting & Finance | 08 | SC-01, ST-01, DT(A) - 01, OBC - 01, SEBC - 01, EWS-01, OPEN-02. **(Horizontal Reservation - Women - 02 Posts)** |
| 6 | Assistant Professor | Management Studie | 08 | SC - 02, ST - 01, DT(A) - 01, NT (B) - 01, OBC - 01, SEBC - 01, EWS -01. **(Horizontal Reservation - Women - 02 Posts)** |
| 7 | Assistant Professor | Commerce | 01 | OPEN-01 |
| 8 | Assistant Professor | Accountancy | 01 | OPEN-01 |

The posts for the reserved category candidates will be filled In by the same category candidates (Domicile of State of Maharashtra) belonging to that particular category only.

Reservation for women will be as per University Circular No. BCC/16/74/1998 dated 10th March, 1998. 4% reservation shall be for the persons with dlsabllIty as per University circular No. Special CELL/ICC/2019-20/05 dated 05th July, 2019.

Candidates having knowledge of Marathi wlll be preferred.

**"Qualification, Pay Scales and other requirement are as prescribed by the UGC Notification dated 18TH July, 2018, Government of Maharashtra Resolution No.Misc-2018/C.R.56/18/UNI-1, dated 8th March, 2019 and University circular No. TAAS/(CT)/ICD/2018-19/1241, dated 26th March, 2019 and revised from time to time" The Government Resolution & Circular are available on the website mu.ac.in**

Applicants who are already employed must Send their application through proper channel.

Applicants are required to account for breaks, if any in their academic career.

Applications with full details should reach to the **CHAIRMAN, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's, Panvel, C/o Changu Kana Thakur Arts, Commerce and Science College, New Panvel (Empowered Autonomous) Plot No. 1, Sector-11, Khanda Colony, New Panvel (W), Tal. Panvel, Dist. Raigad - 410206.** within 15 days from the date of publication of this advertisement. This is University approved advertisement.

- If required Contact - **Mr. Pralhad Thakur – 9022600288**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**Chairman**
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha Panvel



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था

**रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उलवे**

**प्लॉट नं. ०१ व ०२, सेक्टर–१२, उलवे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड–४१०२०६**

U-Dise No.-२७२४४१०००४२ CBSE Affiliation No. ११३१४८३ School No.३१४७२

**✻ शाळेसाठी खालील पदे भरावयाची आहेत.**

**शैक्षणिक पात्रता :–**

१) **ग्रंथपाल (Librarian)** – B. Lib., M. Lib.
२) **शिपाई** – ८ वी पास
३) **बस चालक (ड्राइवर)** – ८ वी पास
४) **बस क्लिनर** – ८ वी पास
५) **सुरक्षा रक्षक (सेक्युरिटी)** – ८ वी पास

वरील पदांसाठी जागा भरावयाच्या आहेत, तरी इच्छुक उमेदवारांनी शाळेत आपला बायो डेटा व त्यासोबत आधार कार्ड, पॅनकार्ड व एक फोटो शाळेत जमा करणे किंवा ई–मेलद्वारे पाठवावे. अनुभवी उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल.

Application can be send by e-mail / hand delivery

**(Contact No. 022-27212067 / 7710072762 / 7710090800)**

Mail your Bio data at Email – rtpsulwe@gmail.com

**श्री रामशेठ ठाकूर (माजी खासदार)**
**चेअरमन , जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था**



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**RAMSHETH THAKUR COLLEGE OF COMMERCE & SCIENCE, KHARGHAR**

**Plot No: 1, Sector -33, Near Pethpada Metro Station, Kharghar, Navi Mumbai - 410210**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2026-2027**

**Full Time Asst. Professors for the Academic Year 2026-2027 on Purely Temporary basis for the following subjects**

| Sr. No | Posts | Subjects | Specializations | Posts Required |
|---|---|---|---|---|
| 1 | Assistant Professors | Accounting & Finance | M.Com. (Advance Accountancy) with (NET/SET/Ph.D.) | 01 |
| 2 | | Management Studies | MBA/MMS (HR) with NET/ SET/Ph.D. M.A. (English) with NET/SET/Ph.D. | 01 |
| 3 | | | MBA/MMS (Finance) with NET/SET/Ph.D. | 01 |
| 4 | | Business Economics | M.Com./M.A.(Economics) (Medium of instruction English) with NET/SET/Ph.D. | 01 |
| 5 | | Information Technology | M.Sc. (Information Technology)/ MCA/MCM with (NET/SET/Ph.D.) | 01 |
| 6 | | Lab Asst. For Computer Science | Any Post Graduate and C-Certificate holder with SET/NET/Ph.D. | 01 |

- Applications with full details (Email address & WhatsApp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman, **J.B.S.P. Sanstha, at Ramsheth Thakur College of Commerce & Science, Kharghar.** Plot No. 1, Sector-33, Near Pethpada Metro Station, Kharghar, Navi Mumbai - 410210
- Candidate may submit the application by email to **principalrtccs@gmail.com** or by post on or before **Monday 13th July 2026.**
- If required Contact -
**Dr. Maheshwari Zirpe (Principal) – 9769884544**
**Mr. Nitin Vaskar – 9821967877**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**Chairman**
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha Panvel



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**CHANGU KANA THAKUR, ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, NEW PANVEL (EMPOWERED AUTONOMOUS)**

**Plot No: 1, Sector -11, Khanda Colony, New Panvel (W) Tal- Panvel. Dist- Raigad. - 410206**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2026-2027**

**Full Time Asst. Professors for the Academic Year 2026-2027 on Purely Temporary basis for the following subjects**

| Sr. No | Posts | Subjects | Specializations | Posts Required |
|---|---|---|---|---|
| 1 | Assistant Professors | Computer Science | M.Sc. (Computer Science / Information Technology MCA/ MCM) with NET/SET/Ph.D. | 05 |
| 2 | | Information Technology | M.Sc. (Computer Science/Information Technology/MCA/MCM) with NET/SET/Ph.D. | 02 |
| 3 | | English | M.A. (English) with NET/SET/Ph.D. | 01 |
| 4 | | Economics | M.A. (Economics) with NET/SET/Ph.D. | 02 |
| 5 | | Physical Education | M.A. (Physical Education) with NET/SET/Ph.D. | 02 |
| 6 | | NSS | M.A. (Social Science/ Political Science/ Economics) with SET/NET/Ph.D. | 01 |
| 7 | | NCC | Any Post Graduate and C-Certificate holder with SET/NET/Ph.D. | 01 |
| 8 | | Interior Design | M.Arch., and B.Sc. in Interior Design. | 01 |
| 9 | | Fashion & Apparel Design | M.Sc. (Fashion Design) Pattern making and garment construction | 01 |

- Applications with full details (Email address & WhatsApp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman, J.B.S.P. Sanstha, **Changu Kana Thakur Arts, Commerce & Science College, New Panvel** (Empowered Autonomous) Plot No.01, Sector-11, Khanda Colony, New Panvel, (W) - 410206.
- Candidate may submit the application by email to **principal@ ckthakurcollege.net** or by post on or before **Monday 13th July 2026.**
- If required Contact - **Mr. Pralhad Thakur – 9022600288**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**Chairman**
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha Panvel



**पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा**
**शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय**
**पता: नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र – ४००७०४**
**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D KARANJA**
An Autonomous Body under Ministry of Education Govt.of India
Address: Naval Armament Depot, Karanja, Uran Raigad, Maharashtra - 400704

| दूरभाष/Tele: 022 –27222132 | ईमेल/E-Mail :kvkaranja@gmail.com | KV CODE: 1205 |
|---|---|---|
| CBSE Affiliation No. 1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE: 27241501112 |

वैबसाइट – **https://nadkaranja.kvs.ac.in** ईमेल: **kvkaranja@gmail.com**

**साक्षात्कार सूचना / Walk-In Interview**
**Urgent Requirement**

पीएम श्री केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शैक्षिक वर्ष **2026-27** हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शैक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है –

| पद का नाम | न्यूनतम योग्यता | साक्षात्कार दिवस |
|---|---|---|
| स्नातकोत्तर शिक्षक (**Post Graduate Teachers)** अर्थशास्त्र**(Economics)** भूगोल (**Geography)** | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में 50% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.ए/एम.एस.सी/ एम.कॉम) एवं बी.एड डिग्री | **06.07.2026 (सोमवार)** |
| प्रशिक्षित स्नातक शिक्षक (**Trained Graduate Teacher)** हिन्दी**(Hindi)** | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में 50% अंकों के साथ स्नातक डिग्री (बी .ए/बी.एस.सी) एवं बी.एड डिग्री) और सी.टी.ई.टी | |
| **प्रशिक्षक**: विशेष शिक्षक Special Educator | सम्बंधित विषय में डिग्री / डिप्लोमा | |

**पंजीकरण समय : 8:00 AM TO 10:00 AM**

नोट: अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें । आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट **http://nadkaranja.kvs.ac.in** से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ आधार कार्ड (Original),तीन पासपोर्टआकार की फोटो, मूल दस्तावेज़ एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

**Application form QR Code**

**प्राचार्य**
**पीएम श्री केवि एन.एडी करंजा**


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात नमूद केलेली सामाईक शेतजमिन मिळकत ही मालक **श्री. शांताराम हासू पाटील व ईतर** यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशील यांनी ठरवलेला आहे व या व्यवहारा संदर्भात जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. शांताराम हासू पाटील** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या आशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत..

मिळकतीचे वर्णन–: **वढाव (५५३८२८)**
**(PU–ID: १२२४७१२७८३४), तालुका– पेण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २३१/२ खाते क्रमांक–५३७ | १ | ०.१४.२० पो.ख. ०.०१.३० एकूण – **०–१५–५०** | २.०८ |

एकूण क्षेत्र ०.१५.५० गुंठ्याचे खरेदीखत

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ हक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **७ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्री पुरावास आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक राहणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक – ३०/०६/२०२६

**सही/–**
**ॲड. निलेश बाळासाहेब झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड – ४१०२०९
मो.क्र– : ९९२०४ ७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात नमूद केलेली सामाईक शेतजमिन मिळकत ही मालक **श्री. नारायण बाबु पाटील व ईतर** यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशील यांनी ठरवलेला आहे व या व्यवहारा संदर्भात जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. नारायण बाबु पाटील व ईतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या आशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत..

मिळकतीचे वर्णन–: **उर्णोली (५५३८७७)**
**(PU–ID: १०८३७७००८४०), तालुका– पेण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४२/२/इ खाते क्रमांक–९१ | १ | ०.१५.९० पो.ख. ०.०२.३० एकूण – **०–१८–२०** | १.०० |

एकूण क्षेत्र ०.१८.२० गुंठ्याचे खरेदीखत

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ हक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **७ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्री पुरावास आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक राहणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक – ३०/०६/२०२६

**सही/–**
**ॲड. निलेश बाळासाहेब झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड – ४१०२०९
मो.क्र– : ९९२०४ ७५८०१

# मतदारांची माहिती संकलित करण्यासाठी घरी येणाऱ्या बीएलओंना सहकार्य करण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

मतदान करणे हा संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला दिलेला हक्क असून मतदार यादीत नाव असण्यासाठी मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमामध्ये प्रत्येक मतदाराने सन २००२ च्या मतदार यादीशी मॅपींग करून घेणे अत्यावश्यक आहे. याकरिता आज ३० जूनपासून २९ जुलैपर्यंत आपल्या घरी येणा-या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी दिलेले गणनापत्र माहिती भरून त्यांच्याकडेच परत करावयाचे आहे. यामध्ये प्रत्येक नागरिकाने सहभागी व्हावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून नागरिक व राजकीय पक्षांना केले.



भारत निवडणूक आयोगाने १४ मे, २०२६ रोजीच्या पत्रान्वये मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम घोषित केला असून ३० जूनपासून बीएलओ यांच्यामार्फत माहिती संकलनासाठी गृहभेटींना सुरूवात झालेली आहे. याविषयी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध वृत्तपत्रे व वृत्तचित्रवाहिनी यांच्यामार्फत नागरिकांपर्यंत माहिती पोहचविण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा नमुंमपा अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार, १५० ऐरोली मतदार नोंदणी अधिकारी श्रीम.प्रिती पाटील व १५१ बेलापूर मतदार नोंदणी अधिकारी श्रीम.अश्विनी पाटील उपस्थित होते.

या कार्यक्रमांतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २ विधानसभा मतदार संघातील ८२७ मतदान केंद्राशी जोडलेल्या ९,१९,६९७ मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठीची पात्रता तपासली जाणार आहे. याकरिता १५० ऐरोली करिता १८ आणि १५१ बेलापूर करिता २० अशा एकूण ३८ सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

यापूर्वी जाहीर केल्याप्रमाणे सेल्फ मॅपींग व प्रोजिनी मॅपींग मध्ये ९,१९,६९७ मतदारांपैकी ४,९७,५९१ मतदारांचे मॅपींग पूर्ण झाले असून आज ३० जूनपासून २९ जुलैपर्यंत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) आपापल्या मतदान केंद्र क्षेत्रातील घरोघरी जाऊन गणनापत्रांचे (Enumeration Form) दोन प्रतीत वितरण करणार आहेत व त्यात नागरिकांनी आवश्यक माहिती भरून स्वाक्षरी केलेली गणनापत्रे स्विकारणार आहेत.

ज्यांचे नाव २०२४ च्या मतदार यादीत समाविष्ट आहे मात्र त्यावेळी वय कमी असल्याने सन २००२ च्या मतदार यादीत नाव समाविष्ट असणार नाही अशा मतदारांनी आपले आई /वडील / आजी / आजोबा यांचे सन २००२ च्या मतदार यादीत असलेले नाव, भाग क्र., मतदार क्रमांक ही माहिती https:// electoralsearch.eci.gov.in/ या वेबसाईटवर अथवा ECI NET या ॲपवर ऑनलाईन शोधून त्या गणनापत्रात नोंदवावयाची आहे. ही माहिती उपलब्ध असेल तर आपले नांव मतदार यादीत समावेश करण्यासाठी वेगळयाने कोणतेही पुरावे देण्याची आवश्यकता नाही. मात्र आपले किंवा आपल्या आई/वडील/आजी आजोबा यांचे नांव सन २००२ चे मतदार यादीत नसेल तर आपल्या जन्म तारखेनुसार गणनापत्रात नमूद केलेली पुराव्याची कागदपत्रे सुनावणीच्या वेळेस जमा करावी लागतील.

बीएलओ यांच्यामार्फत २९ जुलैपर्यंत गणनापत्रे संकलित केल्यानंतर मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात येणार असून ५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिध्द केल्या जाणार आहेत. या प्रारूप मतदार यादीत आपल्या नावाचा समावेश नसल्यास किंवा कोणाच्या नावाच्या समावेशाबाबत हरकत असल्यास मतदार नोंदणी अधिका-यांकडे याबाबत हरकती अथवा दावे ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ पर्यंत दाखल करण्याची मुदत आहे. नोटीस टप्पा / दावे व हरकती निकालात काढण्याचा कालावधी ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर हा असून दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार याद्यांची प्रसिध्दी केली जाणार आहे.

या अंतिमरित्या प्रसिध्द झालेल्या मतदार यादीमध्ये दाखल केलेले दावे किंवा हरकती फेटाळण्यात आल्या असतील तर आपण पुढील १५ दिवसांत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, यांचेकड अपिल करू शकता व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,यांचा निर्णय मान्य नसल्यास पुढील १५ दिवसांत आपण. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडे अंतिम अपिल दाखल करू शकता.

## दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात; मुलांमध्ये वाढतेय संसर्गाची भीती



**नवी मुंबई : बातमीदार**

गेल्या आठवड्यापासून नवी मुंबईतील काही भागांमध्ये दूषित पाणीपुरवठ्याच्या तक्रारी वाढत असून नागरिकांना विविध आरोग्य समस्यांचा सामना करावा लागत आहे. पाण्याला दुर्गंधी येणे, गढूळपणा, पाण्याचा रंग बदलणे आणि चव बदलणे अशा तक्रारी रहिवाशांकडून केल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर पोटाचे विकार, अतिसार, उलट्या, ताप आणि त्वचारोगाच्या तक्रारींमध्ये वाढ होत असल्याची माहिती आरोग्यतज्ज्ञांनी दिली आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक ठिकाणी नळातून येणारे पाणी पिवळसर किंवा गढूळ दिसत असून ते पिण्यास अयोग्य असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही कुटुंबांनी खबरदारी म्हणून बाटलीबंद पाणी किंवा पाणी उकळून वापरण्यास सुरुवात केली आहे.

तज्ज्ञांच्या मते, दूषित पाण्यात जीवाणू, विषाणू किंवा परजीवी असू शकतात, ज्यामुळे गॅस्ट्रोएन्टरायटिस, टायफॉइड, हिपॅटायटिस-ए आणि इतर जलजन्य आजारांचा धोका वाढतो. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आधीपासून इतर आजारांनी ग्रस्त असलेले रुग्णांना याचा अधिक धोका असतो.

डॉ. श्रीराम रघुनाथ नावडे (वरिष्ठ फिजिशियन, इंटेन्सिव्हिस्ट आणि डायबेटोलॉजिस्ट, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, खारघर, नवी मुंबई) म्हणाले, दूषित पाण्यामुळे सर्वाधिक प्रमाणात अतिसार, उलट्या, पोटदुखी आणि ताप यांसारख्या तक्रारी दिसून येतात. पाणी गाळुन व उकळूनच प्यावे. पोटाचे विकार दोन दिवसांपेक्षा जास्त काळ टिकल्यास किंवा लघवीचे प्रमाण कमी झाल्यास तातडीने वैद्यकिय सल्ला घ्यावा.

डॉ. अमित पी. घावडे (बालरोग व नवजात शिशू तज्ज्ञ, मदरहुड हॉस्पिटल, खारघर, नवी मुंबई) सांगतात की, लहान मुलांची रोगप्रतिकारक क्षमता पूर्णपणे विकसित झालेली नसल्याने दूषित पाण्यामुळे त्यांना अतिसार, उलट्या आणि तापाचा त्रास लवकर होऊ शकतो. सध्या ओपीडीत दाखल होणाऱ्या १०० पैकी १५ मुलांमध्ये दुषित पाण्यामुळे होणाऱ्या आरोग्याच्या समस्या आढळून येत आहे. विशेष खबरदारी घेत मुलांना उकळलेले, स्वच्छ पाणी द्यावे, मुलांना हातांची स्वच्छता बाळगण्यास प्रोत्साहन द्या आणि मुलांमध्ये सुस्ती, डोळे खोल जाणे किंवा लघवी कमी होणे तसेच इतर असमान्य लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्या.

**अशी घ्या काळजी**

- पाणी किमान १० मिनिटे उकळून घ्या व त्यानंतर थंड करुन प्या.
- घरी असलेले वॉटर फिल्टर नियमित स्वच्छ करा.
- हात साबणाने स्वच्छ धुवा.
- उघड्यावरचे अन्न आणि कापलेली फळे यांचे सेवन करणे टाळा.
- अतिसार किंवा उलट्या झाल्यास ओआरएस आणि पुरेशा प्रमाणात द्रवपदार्थांचे सेवन करा.
- लक्षणे गंभीर असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## पावसाळी पाण्याच्या निचऱ्याची तातडीने उपाययोजना



**नवी मुंबई : बातमीदार**

उलवे नोड, सेक्टर १८ परिसरात पावसाळ्यात साचणाऱ्या पाण्याच्या निचऱ्याबाबत नागरिकांनी केलेल्या निवेदनाची दखल घेत सिडको प्रशासनाने तातडीने युद्धपातळीवर उपाययोजना राबविल्या. या कार्यवाहीमुळे परिसरातील पाणी साचण्याची समस्या कमी होण्यास मदत झाली असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या पार्श्वभूमीवर सेक्टर १८ मधील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या वतीने कार्यरत अनमोल जीवन वेल्फेअर असोसिएशन तसेच शिवशंभो देवालय ट्रस्ट यांच्या वतीने परिसरातील रहिवाशांनी सिडको प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

नागरिकांच्या समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी सिडको नेहमीच कटिबद्ध असून, भविष्यातही अशाच संवेदनशील व त्वरित कार्यपद्धतीद्वारे नागरिकांना दर्जेदार सेवा देण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू राहणार याचे सिडकोने माहिती देताना सांगितले.

## वटपौर्णिमेच्या दुसऱ्याच दिवशी नेरूळ येथे वडाची आत्महत्या

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ गावातील बांचोली मैदानातील वडाचे झाड वटपौर्णिमेच्या दुसऱ्याच दिवशी उन्मळून पडले.वडाचे झाड हे पाचशे वर्षांपेक्षा अधिक काळ जगते. म्हणूनच या वृक्षाला अमरवृक्ष असेही म्हणतात. असे असताना हे अमर वृक्ष वटपौर्णिमेच्या दुसऱ्याच दिवशी उन्मळून खाली पडल्याच्या घटनेनंतर सर्वत्र आश्चर्य व्यक्त होत असून नेरुळगावात वडाने आत्महत्या केल्याची बातमी दिवसभर चर्चेचा विषय ठरली.



वट पौर्णिमा हे हिंदू धर्मातील एक प्रमुख व्रत आहे. पतीच्या उत्तम आरोग्यासाठी व दीर्घायुष्यासाठी जेष्ठ शुद्ध पौर्णिमेला महिला मनोभावे हे व्रत करतात. सात जन्मी आपल्याला हाच पती मिळावा या श्रद्धेने या दिवशी वडाच्या झाडाला सात प्रदक्षिणा घालण्याची व सात वेळा कच्चा दोरा गुंडाळण्याची परंपरा आहे.

नेरुळगावातील बांचोली मैदानात एक वडाचे झाड असून सोमवारी ज्येष्ठ पौर्णिमेच्या दिवशी येथील महिलांनी याच वडाच्या झाडाची अगदी मनोभावे पूजा – अर्चा केली. सकाळ पासून अगदी सायंकाळ पर्यंत शेकडो महिलांनी या वडाच्या झाडाला सात फेरे घालून, कच्चे पांढरे धागे बांधले. अगरबत्त्या, धुपारत्या ओवाळल्या, पाच प्रकारच्या फळांचा नैवेद्य, नारळ वाहिले, आणि सात जन्मी हाच पती मिळावा म्हणून या वडदेवतेला साकडेही घातले.

परंतु भक्तांचा हा जडभर असह्य झाला म्हणून की काय दुसऱ्याच दिवशी या वडाच्या झाडाने मान खाली टाकली आणि कायमचीच चिरनिद्रा घेतली. पालिकेच्या उद्यान विभागाला ही खबर मिळताच त्यांनी सर्व सोपस्कार पूर्ण केले.

## केबीपी महाविद्यालयात दीक्षारंभ कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये विद्यार्थी कल्याण व विद्यार्थी कौन्सिल समितीच्या वतीने दिनांक २३ ते २७ जून या कालावधीत चार दिवसीय दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रो. डॉ.शुभदा नायक उपस्थित होत्या.



राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार महाविद्यालयांमध्ये पदवीच्या प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या सर्व शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या चार दिवसीय कार्यक्रमात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अंतर्भूत असलेल्या विषयनिहाय क्रेडिट सिस्टम बद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच परीक्षा व मूल्यमापन पद्धत, एनएसएस , एनसीसी, प्लेसमेंट सेल, सांस्कृतिक व क्रीडाविषयक उपक्रम,विद्यार्थी विकासाची उपक्रम, इंटर्नशिप व ग्रंथालयातील सोयी सुविधा इत्यादी वेगवेगळ्या उपक्रमाबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ. शुभदा नायक यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाकडून राबवल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमांची माहिती दिली. तसेच संस्थेची ध्येयधोरणे याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. राजेश्री घोरपडे यांनी विद्यापीठ ॲक्टनुसार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या नियमावलीची व जबाबदारीची माहिती दिली. डॉ. विवेक भोईर यांनी परीक्षा व मूल्यमापन प्रक्रियेबद्दलची सविस्तर माहिती दिली. दीक्षारंभामध्ये विविध ज्ञानशाखेच्या सुमारे नऊशेहुन अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## वनवासी कल्याण आश्रम निवासी विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरुळ येथील युथ कौन्सिल, नेरुळ या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून पनवेल तालुक्यातील चिंचवली येथील वनवासी कल्याण आश्रमातील निवासी विद्यार्थ्यांना शालेय वस्तू, दररोजच्या वापरातील गरजेच्या वस्तू तसेच आश्रमासाठी अन्नधान्य आदी वस्तूंचे वितरण रविवार २८ जून २०२६ रोजी करण्यात आले.




नेरुळ येथील गीत गजानन भजनी मंडळ तसेच समाजसेवक आर. डी. गायकवाड, सिने कलावंत रवींद्र गुरव, प्रकाश वामनराव पवार, चंद्रकांत रामभाऊ राणे आदींचा सक्रिय सहभाग या उपक्रमास मिळाला. यावेळी गीत गजानन भजनी मंडळाच्या अध्यक्षा अपर्णा दाबके, आशा बर्वे, डॉ. धनश्री शिंदे, रमेश सुर्वे आदी मान्यवरांच्या हस्ते विविध शालेय व इतर वस्तू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आल्या. आश्रमात ३९ विद्यार्थी वास्तव्यास आहेत.

यावेळी दंतचिकित्सक डॉ. धनश्री शिंदे यांनी प्रात्यक्षिकासह दातांविषयी सखोल माहिती देऊन विद्यार्थ्यांना दातांची योग्य निगा कशी राखावी, तोंडाचे आरोग्य कसे जपावे आणि निरोगी सवयी कशा अंगीकाराव्यात याविषयी मुलांना मार्गदर्शन केले. मुलांशी प्रत्यक्ष संवाद साधून, मुलांच्या अडचणी विषयी सखोल माहिती घेऊन मुलांच्या समस्यांचे समाधान केले तर अपर्णा दाबके यांनी मुलांबरोबर विविध संवाद साधत मुलांना जीवनाविषयी, त्यांच्या भविष्याविषयी प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले.

वयाची ७५ वर्षे पूर्ण होत असताना आपला अमृत महोत्सवी वाढदिवस या वनवासी कल्याण आश्रमातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करुन समाजसेवेचा आदर्श घालून देणारे आर. डी. गायकवाड तसेच आश्रमात मुलांसाठी अहोरात्र योगदान देणारे आश्रमाचे व्यवस्थापक दिलीप बरफ, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्थेतून वृत्तपत्र विद्या पदविका उत्तीर्ण झाल्याबद्दल भालचंद्र माने यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे सचिव सुभाष हांडे देशमुख यांनी केले. सर्वश्री जी. आर. पाटील, दत्ताराम आंब्रे, दिलीप चिंचोळे, मच्छिंद्रनाथ बोरगे, गोपाळ शिंदे, रवींद्र कांबळे, एस. बी. सिंग, चंद्रसेन कांबळे, अशोकराव महाजन तसेच गीत गजानन भजन मंडळाच्या सदस्यांनी मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

## उरण महाविद्यालयात विकसित भारतविषयी परिसंवाद



**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयातील वाणिज्य तसेच अकाउंटिंग फायनान्स विभागा तर्फे "विकसित भारत २०४७ "या विषयावर अखिल भारतीय स्तरावर इ- कॉन्फरेन्स चे आयोजन करण्यात आले होते.

या इ -कॉन्फरेन्सचे उदघाटन नागालँड विद्यापीठा चे कुलगुरू डॉ. जगदीश कुमार पटनाईक यांनी केले तर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठा चे माजी कुलगुरू डॉ इ. वायूनंदन हे विशेष अतिथी म्हणून लाभले. महाविद्यालया चे प्राचार्य डॉ वाल्मिक गर्जे यांनी या इ- कॉन्फरेन्स ची आवश्यकता सांगून आयोजना चे महत्व सांगितले.या प्रसंगी जेएनयु दिल्ली येथील डॉ अरविंद एलरी यांनी या प्रसंगी आपली भूमिका विशद केली.

या परीसंवादास संशोधक विध्यार्थी यांनी भरघोस प्रतिसाद दिला असून एकूण १४७ संशोधन पेपर प्राप्त झाले . काही विध्यार्थी यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले.या कामी डॉ कुलदीप शर्मा, डॉ मृदुल निळे, डॉ. मंदार चौधरी, डॉ उपेंद्र चौधरी डॉ चंद्रमोहन जोशी डॉ सुरेश मैद्य डॉ देविदास गेल्हार हे पॅनलिस्ट म्हणून लाभले. परीसंवादा ची सांगता बनारस विद्यापीठातील डॉ तेज प्रताप सिंग यांच्या भाषणाने झाली. अध्यक्ष कपिल पाटील व प्राचार्य डॉ वाल्मिक गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कॉन्फरेन्स चे सूत्रसंचालन डॉ हन्नत शेख यांनी केले. वाणिज्य विभाग प्रमुख प्रा व्ही एस इंदुलकर, तसेच डॉ पराग कारुळकर, प्रा. रियाझ पठाण, डॉ हनुमंतराव जगताप डॉ. अरुण चव्हाण, प्रा. विनिता तांडेल प्रा गुप्ता प्रा.दिपू यादव सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विध्यार्थी यांनी या करिता विशेष मेहनत घेतली.

## तलावात बुडून १७ वर्षीय युवकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील भारती विद्यापीठ मागील डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या तलावात पोहण्यासाठी उतरलेल्या १७वर्षीय युवकाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पावसाळ्यात धोकादायक ठिकाणी जाणाऱ्या पर्यटकांबाबत पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली जात आहे.

मुंबई शहरातील धारावी येथील काही तरुण खारघर मध्ये फिरण्यासाठी आले होते. भारती विद्यापीठ मागील डोंगराच्या पायथ्याशी असलेला तलाव सध्या मुसळधार पावसामुळे पूर्ण भरुन वाहत आहे. या तलावात काही तरुण पोहण्यासाठी उतरले. परंतु, तलावाच्या खोलीचा अंदाज न आल्याने आश्रफ शेख (१७) तलावातील पाण्यात बुडाला. त्याला वाचविण्याचे प्रयत्न करण्यात आले. या घटनेची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## सार्वजनिक तक्रार प्रणाली अंतर्गत सिडकोच्या दोन विभागांकडून जलद निवारण

**नवी मुंबई : बातमीदार**

नागरिकाभिमुख प्रशासन अधिक सक्षम करण्याच्या दिशेने सिडकोच्या दोन विभागांनी विविध सार्वजनिक तक्रार निवारण मंचांवरील तक्रारींचे अवघ्या एका आठवड्यात उल्लेखनीय निवारण करून प्रभावी कामगिरी केली आहे. नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत आणि प्रभावीपणे निवारण करून या विभागांनी प्रतिसादक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासनाबाबतची सिडकोची बांधिलकी अधोरेखित केली आहे.



गृहनिर्माण विभागाने आपले सरकार, पीजी पोर्टल आणि मुख्यमंत्री कार्यालय तक्रार निवारण प्रणालीवरील सर्व प्रलंबित तक्रारींचे यशस्वीपणे निवारण केले. प्रभावी समन्वय आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विविध तक्रार निवारण मंचांवरील तक्रारींचे वेळेत निवारण करण्यात विभागाला यश आले.

त्याचप्रमाणे, सहनिबंधक विभागाने विविध सार्वजनिक तक्रार निवारण मंचांसह मुख्यमंत्री कार्यालय तक्रार पोर्टलवरील ३२३ तक्रारींचे यशस्वी निवारण करून प्रलंबित तक्रारींमध्ये लक्षणीय घट केली. विभागाच्या सक्रिय व पद्धतशीर कार्यपद्धतीमुळे तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम झाली आहे.नागरिकांच्या तक्रारींचे जलद आणि प्रभावी निवारण सुनिश्चित करून सिडकोने पारदर्शक, कार्यक्षम आणि नागरिककेंद्री सेवा देण्याबाबतची आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली आहे.

*"नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निवारण आणि त्यावर दर्जेदार व समाधानकारक प्रतिसाद देणे, हे प्रतिसादक्षम प्रशासनाचे महत्त्वाचे मापदंड आहेत. या विभागांनी केलेली कामगिरी सिडकोची उत्तरदायित्व, कार्यक्षमता आणि लोकसेवेप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित करते. सर्व विभागांसाठी प्रेरणादायी ठरलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांचे मी मनःपूर्वक कौतुक करतो."*

*–**अश्विन मुद्गल**, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको*

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# माणगावचा नवा पूल धोक्याच्या उंबरठ्यावर, भराव खचल्याने भेगा; अपघाताची शक्यता



**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

मुंबईगोवा राष्ट्रीय महामार्गावरील माणगाव शहरातील काळ नदीवरील नव्याने बांधण्यात आलेला पूल आणि त्यालगतचा रस्ता गंभीर अवस्थेत असल्याचे समोर आले असून, पुलाच्या दोन्ही बाजूंचा भराव खचल्याने नागरिक आणि वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पुलाच्या दक्षिण व उत्तर बाजूस मातीचा भराव बसल्याने महामार्गावर ठिकठिकाणी भेगा, खड्डे आणि खचलेले भाग दिसून येत आहेत. त्यामुळे भविष्यात मोठा अपघात घडण्याची शक्यता व्यक्त होत असून, माणगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक ज्ञानदेव पवार यांनी ठेकेदारावर कठोर कारवाई करून पुलाचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करा अशी मागणी केली आहे.

स्थानिकांच्या मते, पुलाचे बांधकाम अत्यंत घाईगडबडीत करण्यात आले. भराव करताना आवश्यक त्या तांत्रिक निकषांचे पालन करण्यात आले नाही. मातीचे योग्य प्रकारे रोलिंग करण्यात आले नाही तसेच आवश्यक प्रमाणात पाणीही मारण्यात आले नसल्याने भराव सुरुवातीपासूनच कमकुवत राहिला. परिणामी काही दिवसांतच तो खचू लागला असून रस्त्यावर भेगा पडल्या आहेत. डांबरीकरणाचाही दर्जा समाधानकारक नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दररोज हजारो वाहने या पुलावरून प्रवास करतात. मुंबईगोवा महामार्गावरील हा महत्त्वाचा दुवा असल्याने वाहनांची मोठी वर्दळ असते. अशा परिस्थितीत पुलाची सद्यस्थिती पाहता कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची मोठी किंमत नागरिकांना जीव गमावून चुकवावी लागू शकते, अशी भीती व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित ठेकेदाराला मुदतीत काम पूर्ण न केल्याबद्दल आर्थिक दंडही ठोठावण्यात आला आहे. मात्र दंडाची रक्कम वाढू नये म्हणून कामाची गुणवत्ता आणि सुरक्षितता याकडे दुर्लक्ष करून काम उरकण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

महामार्गाच्या रखडलेल्या कामामुळे नागरिक आधीच त्रस्त आहेत. त्यात नव्याने पूर्ण झालेल्या कामांमध्येही अशा प्रकारच्या त्रुटी आढळत असल्याने संबंधित विभागाने तातडीने या ठिकाणाची पाहणी करून खड्डा आणि खचलेला भराव दुरुस्त करावा, तसेच संपूर्ण कामाच्या गुणवत्तेची तपासणी करावी.

## सिलिंडरवाहक ट्रकला आग; सुदैवाने मोठा अनर्थ टळला

**खालापूर : प्रतिनिधी**




रसायनी येथील सावरोली खारपाडा मार्गावरील चावणे गावाजवळ एलपीजी वाहतूक करणाऱ्या ट्रकला आग लागली. ट्रकची केबीन आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. अपघात स्थळापासून जवळच रसायनी एमआयडीसीची पाताळगंगा फायर ब्रिगेडची टीम असल्याने अग्तानिशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल होत एक तासांच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवले.

स्वयंपाकाच्या गॅसचे सिलिंडर वाहून नेणाऱ्या ट्रकची केबिन पुर्णपणे जळाली. मात्र मागील भागात असलेल्या सिलिंडरना कोणत्याही स्वरूपाचा धक्का लागला नाही. सर्व दुसऱ्या वाहनात शिफ्ट करण्यात आले आहे. केमिकल एक्स्पर्ट सामाजिक कार्यकर्ते धनंजय गीध व पोलीस घटनास्थळी उपस्थित होते. ही घटना बुधवारी दुपारी १ वा सुमारास घडली.

या दुर्घटने पासुन हाकेच्या अंतरावर २ किमी अंतराच्या परिसरात स्वयंपाक गॅस फिलींग करण्याचा मोठा फिलींग सेंटर आहे. ओएनजीसी उरण येथील समुद्रातूंन जमीनी खालून पाइप लाइनद्वारे एलपीजी गॅस आणला जातो आणि सिलिंडर मधे फिलींग करुन जिल्ह्यात वितरण केले जाते. याच परिसरात सिलिंडर वाहक ट्रक जळाल्याने काही काळ परिसरात चिंतेचे वातावरण होते. मात्र अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ धाव घेतली आणि रहिवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

## रसायनीत फ्लॅटमध्ये अडकलेले बाळ सुखरूप; हेल्प फाउंडेशनची मदत

**खोपोली : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस स्टेशन हद्दीत अक्षर रिव्हर सोसायटीच्या एका बिल्डिंग मध्ये सहाव्या फ्लोअरवर आईकडून अनावधानाने तिचा अडीच वर्षाचा मुलगा दिक्षाम सुदाम सोनावळे हा फ्लॅटमध्ये अडकला

ऑटोमॅटिक लॅचमुळे त्याला बाहेर काढणे शक्य न झाल्याने हेल्प फाउंडेशन रसायनी यांना पोलीस यंत्रणेच्या माध्यमातून कॉल मिळाला. धनंजय गीध आणि मंदार अंबवणे यांनी तातडीने त्या ठिकाणी धाव घेऊन लॅच उघडून बाळाला सुखरूप आईच्या ताब्यात दिले. त्यावेळी रासायनी पोलीस यंत्रणेचे कर्मचारी आणि अधिकारी त्या ठिकाणी उपस्थित होते.



## चौक ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपच्या नैना झिंगे

**चौक : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत चौक च्या उपसरपंच पदाची आज निवडणूक झाली, भारतीय जनता पक्षाच्या सौ.नैना आनंद झिंगे या बिनविरोध निवडून आल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ग्रुप ग्रामपंचायत उपसरपंच सौ. पूजा जगदीश हातमोडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदाची आज निवडणूक निर्णय अधिकारी तथा सरपंच रितू ठोंबरे यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली,

उपसरपंच पदासाठी भारतीय जनता पक्षाच्या नैना झिंगे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्या बिनविरोध निवडून आल्याचे सरपंच तथा निवडणूक निर्णय अधिकारी रितू ठोंबरे यांनी जाहीर केले. सहायक निवडणूक अधिकारी म्हणून ग्राम पंचायत अधिकारी गणेश मोरे यांनी कामकाज पाहिले.



नयना आनंद झिंगे या खालापूर तालुका भाजप महिला आघाडी प्रमुख असून अंबिका मित्र मंडळाच्या सक्रिय सदस्य असून, महिला बचत गट, महिला सक्षमीकरण यांच्यासाठी कार्य करतात, महिलांसाठी कार्य करणाऱ्या एक सक्षम व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. उपसरपंच पदाची संधी दिल्या बद्दल भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, सचिन मते, दत्ता मांडे यांचे आभार व्यक्त करून सरपंच रितू ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली चौक ग्राम पंचायतीच्या उन्नतीसाठी आणि महिला सक्षमीकरण यांच्यासाठी कार्य करू असे नवनिर्वाचित उपसरपंच सौ. नयना आनंद झिंगे यांनी सांगितले.

यावेळी भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, जेष्ठ नेते एकनाथ मते, सरपंच रितू ठोंबरे, दत्ता मांडे, राजन गावडे, नितीन मालुसरे, मयूर मांडे, तुपगाव उप सरपंच सचिन साखरे, सुरेश पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य सौ.पद्मा पाटील यांच्या सह सर्व ग्राम पंचायत महिला सदस्य, ग्राम पंचायत अधिकारी गणेश मोरे, कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

## प्रमिला कर्ण ३८ वर्षाच्या प्रदीर्घ शिक्षकी सेवेतून निवृत्त



**खोपोली :** आपल्या ३८ वर्षाच्या शिक्षकी पेशातून प्रमिला रवींद्र कर्ण मंगळवारी सेवानिवृत्त झाल्या, यानिमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खोपोली नगरपालिका हद्दीतील नगरपालिका शिक्षण मंडळाच्या लव्हेज शाळा क्रमांक ८ या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, नगरसेविका रूपाली जाधव, रुकसाना जळगावकर, श्रुती पालांडे, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड,सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाटील, विवेक पाटील, श्रावण गायकवाड निवृत्ती मोरे, रवींद्र कर्णिकईत्यादी सह अनेक मान्यवर उपस्थित होते.


**पनवेल महानगरपालिका**

**धोकादायक/ अतिधोकादायक इमारतींबाबत जाहीर सूचना**

**सन २०२६-२७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६४ ते २६८ मधील तरतुदी तसेच शासन संदर्भ विसआ-२१५/ प्र.क्र. ३४९/ नवि-२०, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१५ नुसार व त्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेने निश्चित केलेल्या कार्यपध्दती (एस. ओ.पी.) नुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात कार्यक्षेत्रातील अतिधोकादायक व धोकादायक मिळकतीचे संबंधीत प्रभागामार्फत सर्वेक्षण करण्यात आले असुन, सर्वेक्षणाअंती प्रभाग समिती अ- ४, प्रभाग समिती ब- २०, प्रभाग समिती क- ८, प्रभाग समिती ड-३२ अतंर्गत एकुण ६४ सी-१ या प्रवर्गात मोडणाऱ्या मिळकती जाहिर करण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीतील रहिवाश्यांना त्यांच्या सदनिका रिक्त करण्याकरीता महानगरपालिकेकडून वेळोवळी नोटिसद्वारे कळविण्यात आलेले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच राज्य शासनाने धोकादायक मिळकतीबाबत करावयाची कारवाईचे अनुषंगाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार मुळ मालक/ भोगवटादार यांना पुरेशी संधी देऊनही संबंधितांनी इमारत रिक्त करुन पाडण्याची कार्यवाही केली नाही तर या मिळकतीचा विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा खंडीत करणे व त्यानुसार मिळकती पोलीसांमार्फत निर्मनुष्य करुन पाडण्याची कार्यवाही मनपामार्फत करण्यात येते.

तथापी काही मिळकतीमध्ये अजुनही नागरीक वास्तव्यास आहेत. पुढील कालावधीत पावसाळा सुरु होणार असून अतिवृष्टी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे धोकादायक व अतिधोकादायक इमारतीतील नागरीकांनी त्या इमारती त्वरीत रिकाम्या करुन, निर्मनुष्य करुन, विना विलंब सदर अतिधोकादायक / धोकादायक इमारती स्वत:हुन सुरक्षितरित्या पाडण्याची कार्यवाही करावी. धोकादायक इमारत कोसळून काही दुर्घटना घडल्यास व त्यात जिवीत व वित्त हानी झाल्यास त्या बाबतची सर्वस्वी जबाबदारी इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या संबंधित नागरीकांची तसेच इमारतीचे मालक व भाडेकरु यांची राहील. त्याचप्रमाणे अतिधोकादायक मालमत्तांचे स्ट्रक्चरल ऑडीट (Structural Audit) करुन घेण्याची जबाबदारी संबंधित घरमालक/ भोगवटादार यांची राहील. याकरीता महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी. अशा मोडकळीस आलेल्या धोकादायक/ अतिधोकादायक इमारतींची यादी महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळ (Website) प्रसिध्द करणेत आलेली आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांची जीवित व वित्त हानी टाळण्याच्या दृष्टीने जागरुक राहणे ही नागरीकांनचीही जबाबदारी आहे. त्यामुळे आपण सर्वजण जबाबदार नागरीक म्हणुन आपआपल्या परिसरातील इमारतीवर लक्ष ठेवून भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने धोकादायक अतिधोकादायक इमारती निर्मनुष्य करुन सुरक्षित स्थळी आपण रहिवास हलवून सहकार्य करावे.

आपत्कालीन परिस्थितीत पुढील दुरध्वनी/ Toll Free क्रमांकावर संपर्क साधावा.

दूरध्वनी क्रमांक :- ०२२- ७४५८०४०/४१/४२

Toll Free क्रमांक :- १८००-२२७-७०१

सही/-
(मंगेश चितळे)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

पमपा/अ.बां.नि./२४२६/जा.क्र. / २०२६
दिनांक : ०२/०७/२०२६



**पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग**

शिक्षण विभाग, लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय,आगरी समाज हॉल व दांडेकर हॉस्पिटल समोर,पनवेल – ४१० २०६.

Email - msbpanvel1993@gmail.com Email :panvelcorporation@gmail.com

जा.क्र.पमपा/शिक्षण/२९२६/प्र.क्र.०३/लेखा-१/३५५/ २०२६ दिनांक - ०१/०७/२०२६

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग नोंदणीकृत पुरवठा धारक यांचेकडून सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामध्ये पनवेल महानगरपालिकेच्या शाळेतील इ. १ ली ते ८ वी (मराठी, उर्दु, गुजराती माध्यम) यांचेसाठी पीटी शूज सॉक्ससह व ज्युनियर केजी ते इयत्ता ७ वी (इंग्रजी माध्यम) विद्यार्थ्यांकरिता काळे शुज सॉक्ससह, पीटी शुज सॉक्ससह साहित्य खरेदी करणेसाठी खालील तपशीलानुसार दरपत्रक मागविण्यात येत आहेत. इच्छुक पुरवठादारांनी सदरचे दरपत्रक दि. ०२/०७/२०२६ ते दि. ०८/०७/२०२६ रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे (लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल) समक्ष सादर करावीत व प्राप्त दरपत्रके दि. ०८/०७/२०२६ रोजी पुरवठादारांचे समक्ष उपायुक्त (शिक्षण) यांचे दालनात सायंकाळी ५.०० वाजता उघडण्यात येतील. वरील दिनांका नंतर प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

| १. काळे शूज व सॉक्ससह तपशील (Spcification) | २. पी.टी. शूज सॉक्ससह तपशील (Spcification) |
|---|---|
| • कंपनी – Bata, Paragon, libirty etc. नामांकित कंपनी<br>• मटेरियअल -PVC गोला, वेलक्रो सह<br>• कलर – काळा<br>• साईज – १ ते८<br>• जेन्डर – Unisex<br>• सॉक्स –निळा रंग (डबल धागा, लायक्रा कॉटन) | • कंपनी – Bata, Paragon, libirty etc. नामांकित कंपनी<br>• मटेरियअल -PVC गोला, वेलक्रो सह<br>• कलर – व्हाइट<br>• साईज – १ ते८<br>• जेन्डर – Unisex<br>• सॉक्स –सफेद रंग (डबल धागा, लायक्रा कॉटन) |

इयत्ता निहाय विद्यार्थी संख्या :-

**अ) पीटी शूज सॉक्ससह**

| अ.क्र. | इयत्ता | विद्यार्थी संख्या | मुले/ मुली पीटी शूज सॉक्ससह १ जोडीची किंमत (GST शिवाय) (रक्कम रु.) |
|---|---|---|---|
| १ | ज्युनि. व सिनि. केजी | ८० | |
| २ | इ. १ ली ते ४ थी | ११५० | |
| ३ | इ. ५ वी ते ८ वी | ११८१ | |

**ब) काळे शूज सॉक्ससह**

| अ.क्र. | इयत्ता | विद्यार्थी संख्या | मुले/ मुली काळे शूज सॉक्ससह १ जोडीची किंमत (GST शिवाय) (रक्कम रु.) |
|---|---|---|---|
| १ | ज्युनि. व सिनि. केजी | ८० | |
| २ | इ. १ ली ते ४ थी | १६२ | |
| ३ | इ. ५ वी ते ७ वी | ११६ | |

अटी व शर्ती खालील प्रमाणे :-

१. GST प्रमाणपत्र अनिवार्य.
२. संस्था नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य.
३. पॅनकार्ड (संस्था/मालकाचे नावाने)
४. नमूद केलेले दर हे सर्व प्रकारच्या वाहतुक खर्चासह समाविष्ट असावेत.
५. अ.क्र. १, २ व ३ मधील कागदपत्रे लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावीत. लिफाफा क्र. १ मधील सर्व आवश्यक कागदपत्राची पुर्तता केलेली असल्यास पात्र पुरवठादाराचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.
६. काळे शूज सॉक्ससह व पीटी शूज सॉक्ससह यांची दरपत्रक लिफाफा क्र. २ मध्ये सादर करावेत.
७. पुरवठादाराने शाळा निहाय पुरवठा करणे बंधनकारक राहील.
८. याकामी अधिकची माहिती हवी असल्यास शिक्षण विभाग, पनवेल महानगरपालिकेकडे संपर्क साधावा.
९. कोणतेही दरपत्रक नाकारण्याचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे.

सही/-
( नानासाहेब कामठे)
उपायुक्त ( शिक्षण)
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.१८४/१९६/२०२६

# ४० वर्षांनंतर मेक्सिकोचा ऐतिहासिक विजय

## इक्वेडोरला नमवत राऊंड ऑफ-१६मध्ये धडक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मेक्सिको आणि इक्वेडोर यांच्यात फिफा विश्वचषक राऊंड ऑफ ३२ मधील सामना खेळवला गेला. वादळी पावसामुळे सामना तब्बल एक तास उशिरा सुरू झाला, तरीही ८० हजारांहून अधिक चाहत्यांचा उत्साह किंचितही कमी झाला नाही. सामना सुरू होण्याच्या बराच आधीपासूनच अझ्टेका स्टेडियममध्ये चाहत्यांच्या घोषणांनी व गाण्यांनी वातावरण भारावून गेलं होतं. अखेर मेक्सिकोने आपल्या चाहत्यांना गेल्या चार दशकांपासून प्रतीक्षेत असलेला ऐतिहासिक क्षण अनुभवण्याची संधी दिली आणि फिफाच्या बादफेरीत विजय मिळवला.

प्रशिक्षक हाव्हिएर अगिरे यांच्या मार्गदर्शनाखालील मेक्सिकोने इक्वेडोरचा २-० असा पराभव करत १९८६ नंतर प्रथमच फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीत विजय मिळवला आणि उपउपांत्यपूर्व फेरीतील स्थान निश्चित केलं. सहयजमान मेक्सिकोने स्पर्धेतील आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली. ज्युलियन क्विनोनेस आणि



राऊल जिमेनेझ यांनी पहिल्या हाफमध्ये गोल करत संघाला भक्कम आघाडी मिळवून दिली. त्यानंतर बचावफळीने शिस्तबद्ध खेळ करत इक्वेडोरला एकही गोल करू दिला नाही आणि आणखी एक 'क्लीन शीट' नोंदवत मेक्सिकोच्या शानदार विजयावर शिक्कामोर्तब केलं.

या विजयासह मेक्सिकोने १९९४ पासून फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीतील सलग सात पराभवांची मालिका अखेर खंडित केली. आता उपउपांत्यपूर्व फेरीत अझ्टेका स्टेडियमवर मेक्सिकोचा सामना इंग्लंड किंवा डीआर काँगो या सामन्यातील विजेत्या संघाशी होणार आहे. सामन्यानंतर प्रशिक्षक हाव्हिएर अगिरे म्हणाले, "पहिल्या हाफमध्ये उत्कृष्ट खेळ केला. दुसऱ्या हाफमध्येही बचावावर लक्ष केंद्रित केलं. स्टेडियममधील वातावरण व चाहत्यांचा आनंद पाहता संघ व समर्थकांत एक अतूट नातं निर्माण झाल्याची मला खात्री वाटते."

स्टेडियम परिसरात विजांचा कडकडाट होत असल्याने सामना एक तास उशिरा सुरू झाला, मात्र खेळ सुरू होताच मेक्सिकोने आक्रमक सुरुवात केली. आत्मविश्वासाने चेंडूवर नियंत्रण ठेवत त्यांनी सुरुवातीपासूनच इक्वेडोरवर दबाव निर्माण केला व त्यांना त्यांच्या अर्ध्या भागातच खेळण्यास भाग पाडलं. अझ्टेका स्टेडियममध्ये जल्लोषाची आणखी एक लाट उसळली, जेव्हा सामन्याच्या नवव्या मिनिटानंतर इक्वेडोरने स्वतःच्या पेनल्टी क्षेत्राजवळ चेंडूवरील नियंत्रण गमावलं. राऊल जिमेनेझने स्वतःच आक्रमणाची सुरुवात केली. ज्युलियन क्विनोनेससोबत अप्रतिम पास करत पहिल्याच टचमध्ये चेंडू थेट गोलच्या वरच्या कोपऱ्यात धाडला. हा त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ४७वा गोल ठरला. यासह मेक्सिकोसाठी सर्वाधिक गोल करणाऱ्या हाविएर हर्नांडेझ यांच्या विक्रमी ५२ गोल्सपासून तो केवळ पाच गोल दूर आहे.

# हार्दिक पांड्याचा भाव वधारला!

■ सात फ्रँचायझी इच्छुक, सीएसकेदेखील शर्यतीत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारताचा अष्टपैलू खेळाडू व आयपीएलमधील मुंबई इंडियन्स संघाचा कर्णधार हार्दिक पांड्याला पुढील सीझनपूर्वी मुंबईचा संघ रिलीज करणार असल्याची चर्चा आहे. हार्दिकला 'ट्रेड' केलं जाऊ शकतं आणि आगामी हंगामात तो दुसऱ्या संघाकडून खेळताना दिसू शकतो. यासंदर्भात अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसली तरी आयपीएल २०२६ संपल्यानंतर मुंबई आणि हार्दिक यांच्याकडून मिळणारे संकेत या चर्चांना दुजोरा देत आहेत. आता हार्दिक पांड्याला आपल्या संघात घेण्यासाठी सात फ्रँचायझी उत्सुक आहेत.

अनेक फ्रँचायझी हार्दिक पांड्याला आपल्या संघात सामील करून घेण्यास उत्सुक आहेत. एका अहवालानुसार मुंबई वगळता उर्वरित नऊपैकी सात फ्रँचायझींनी हार्दिकला करारबद्ध करण्यात रस दाखवला आहे. यामध्ये आता चेन्नई सुपर किंग्स संघदेखील सामील झाला आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद यांशिवाय इतर सात फ्रँचायझी हार्दिकला आपल्या संघात सामील करून घेण्यास उत्सुक आहेत. या यादीत चेन्नई सुपर किंग्सचाही समावेश झाला आहे. कारण गेल्या आठवड्यापर्यंत त्यांनी हार्दिकला करारबद्ध करण्यात कोणताही रस नसल्याचं सांगत या गोष्टीला नकार दिला होता.

आता असा दावा केला जात आहे की चेन्नई सुपर किंग्सदेखील ही फ्रँचायझी विकत घेऊ शकते. असे असले तरी हार्दिकला आपल्या संघात सामील करून घेण्यासाठी राजस्थान रॉयल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स हेच सर्वाधिक उत्सुक आहेत. दोन्ही फ्रँचायझी त्याला कर्णधारपद सोपवण्यासही तयार आहेत. विशेषतः केकेआरला कर्णधाराची अत्यंत गरज आहे. राजस्थान रॉयल्सच्या नेतृत्त्वाची जबाबदारी रियान परागच्या खांद्यावर आहे, पण हार्दिक जर संघात सामील झाला तर त्याला नेतृत्वाची जबाबदारी देण्यात येईल.

चेन्नईला हार्दिकला आपल्या संघात सामील करून घेण्यात रस आहे, परंतु ते त्याला नेतृत्वाची संधी देण्याची हमी देणार नाहीत. सध्या त्यांच्याकडे ऋतुराज गायकवाड कर्णधार म्हणून आहे. संजू सॅमसन हादेखील एक पर्याय आहे. आयपीएल २०२६ पूर्वी सीएसकेने रवींद्र जडेजा आणि सॅम करन यांच्या बदल्यात 'ट्रेड'द्वारे राजस्थानकडून संजूला आपल्या संघात घेतले होते.

# अर्लिंग हालँडच्या गोलने नॉर्वेची बाद फेरीत धडक

**अर्लिंग्टन, टेक्सास : वृत्तसंस्था**

अर्लिंग हालँडने ८६ व्या मिनिटाला केलेल्या निर्णायक गोलच्या जोरावर नॉर्वेने आयव्हरी कोस्टचा २-१ने पराभव करत विश्वचषकाच्या बाद फेरीत ऐतिहासिक विजय मिळवला. नॉर्वेने आपल्या विश्वचषक इतिहासात पहिल्यांदाच बाद फेरीचा सामना जिंकला असून या विजयामुळे संपूर्ण नॉर्वे संघात उत्साहाचे वातावरण आहे. फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेने आता बाद फेरीत प्रवेश केला असून प्रत्येक सामना निर्णायक ठरत आहे.

८६व्या मिनिटाला पॅट्रिक बर्गच्या पासवर हालँडने डाव्या पायाच्या हलक्या स्पर्शाने चेंडू जाळ्यात धाडून संघाला विजय मिळवून दिला. या स्पर्धेतील



हालँडचा हा पाचवा गोल होता. सामन्याच्या ३९व्या मिनिटाला अँटोनियो नुसाने वळणदार किकद्वारे नॉर्वेचे खाते उघडले होते. ७४व्या मिनिटाला अमाद डायलोने गोल करत सामना १-१ असा बरोबरीत आणला होता, मात्र नॉर्वेने अखेरच्या क्षणी बाजी मारली.

सामन्याच्या अतिरिक्त वेळेत डायलोने मारलेली फ्री किक नॉर्वेचा गोलकीपर ऑर्जन नायलांडने अत्यंत चपळतेने अडवून संघाचा विजय सुरक्षित केला. हा सामना नॉर्वेसाठी अनेक अर्थांनी खास ठरला. २८ वर्षांनंतर नॉर्वे पुन्हा एकदा विश्वचषकात ब्राझीलसारख्या बलाढ्य संघाशी भिडणार आहे. १९९८ मध्ये नॉर्वेने ब्राझीलविरुद्ध असाच थरारक २-१ असा विजय मिळवला होता. सामन्यानंतर अर्लिंग हालँडने या विजयाचे वर्णन "इतिहास" असे केले.

विजयाचा जल्लोष साजरा करताना खेळाडूंनी 'वायकिंग रो' सादर केला. संघाचा कर्णधार मार्टिन ओडीगार्ड याने संघाच्या मेहनतीचे कौतुक केले, तर प्रशिक्षक स्टाले सोल्बाकेन यांनी कठीण प्रसंगात खेळाडूंनी दाखवलेल्या संयमाचे स्वागत केले. आता नॉर्वेचा पुढील सामना न्यू जर्सीमधील मेटलाइफ स्टेडियमवर पाच वेळच्या विश्वविजेत्या ब्राझीलविरुद्ध होणार आहे. या विजयामुळे नॉर्वेचे मनोबल उंचावले असून, चाहत्यांना आता ब्राझीलविरुद्धच्या सामन्याची उत्सुकता लागली आहे.

# फ्रान्सची स्वीडनवर ३-०ने मात

## एमबाप्पेची धडाकेबाज कामगिरी



**ईस्ट रदरफोर्ड : वृत्तसंस्था**

किलियन एमबाप्पेच्या दोन शानदार गोलांच्या जोरावर फ्रान्सने स्वीडनचा ३-०ने पराभव करीत विश्वचषकाच्या बाद फेरीत दमदार प्रवेश केला आहे. या विजयामुळे फ्रान्सचा संघ आता ४ जुलै रोजी फिलाडेल्फिया येथे होणाऱ्या सामन्यात पॅराग्वेविरुद्ध आमनेसामने असेल.

या विश्वचषकातील आपल्या तिसऱ्या सामन्यात दोन गोल नोंदवत एमबाप्पेने एकूण ६ गोलांसह लिओनेल मेस्सीच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. स्पर्धेच्या बाद फेरीत सर्वाधिक गोल करण्याचा नवा विक्रमही एमबाप्पेने प्रस्थापित केला आहे. एमबाप्पेने ४५व्या आणि ७४व्या मिनिटाला गोल केले, तर ब्रॅडली बारकोलाने ५३व्या मिनिटाला संघासाठी तिसरा गोल नोंदवला. या विजयामुळे सलग पाच विश्वचषक सामन्यांमध्ये तीन किंवा अधिक गोल करणारा फ्रान्स पहिला देश ठरला आहे.

फ्रान्सचा खेळाडू मायकेल ओलिसे याने या सामन्यातही उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. त्याच्या नावावर आता ५ असिस्ट झाले असून विश्वचषक स्पर्धेतील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. सामन्यानंतर फ्रान्सचे प्रशिक्षक डिडिएर डेशॅम्प्स यांनी एमबाप्पेच्या कामगिरीचे कौतुक केले आणि संघ एका मोठ्या मोहिमेवर असल्याचे नमूद केले. तर स्वीडनचे प्रशिक्षक ग्रॅहम पॉटर यांनी फ्रान्सच्या खेळातील दर्जेदार कामगिरी आणि बदली खेळाडूंच्या मजबूत पर्यायांचे विशेष कौतुक केले. आता फ्रान्सचे लक्ष ४ जुलैला होणाऱ्या पॅराग्वेविरुद्धच्या महत्त्वपूर्ण लढतीवर आहे. या सामन्यातील विजेता संघ उपांत्यपूर्व फेरीत कॅनडा किंवा मोरोक्कोविरुद्ध खेळेल. एमबाप्पेच्या झगमगत्या फॉर्ममुळे फ्रान्सला सलग तिसऱ्यांदा विश्वचषक अंतिम फेरीत पोहचण्यासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे.

# सूर्यवंशीच्या प्रसिद्धीबद्दल मला माहीत नाही

## श्रेयस अय्यरचा खुलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पहिल्या टी-२० सामन्यापूर्वी १५ वर्षांचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीच्या आंतरराष्ट्रीय पदार्पणाची जोरदार चर्चा रंगली आहे. क्रिकेटचे दिग्गजच नव्हे तर देशातील मोठे राजकारणीही वैभवच्या कौतुकात व्यस्त आहेत, मात्र या सर्व घडामोडींवर भारतीय टी-२० संघाचा कर्णधार श्रेयस अय्यरने अत्यंत धक्कादायक आणि थेट प्रतिक्रिया दिली आहे.

पत्रकार परिषदेत जेव्हा श्रेयस अय्यरला वैभव सूर्यवंशीभोवती निर्माण झालेल्या हाईपबद्दल आणि सोशल मीडिया ट्रेंड्सबद्दल विचारण्यात आले, तेव्हा तो म्हणाला की, मी खरंच काहीही पाहत नाही. खरं सांगायचं तर मला याबद्दल काहीच माहीत नाही. मी तुमची



न्यूज फॉलो करत नाही, ना मी इन्स्टाग्राम किंवा सोशल मीडियावर काय चाललंय हे पाहतो. माझ्या कानावर अशी कोणतीही चर्चा आलेली नाही." कॅप्टन अय्यरने आपण आपल्या सहकाऱ्यांबद्दल सोशल मीडियावर होणाऱ्या चर्चांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत असल्याचे स्पष्ट केले आहे.


वैभव सूर्यवंशीच्या लोकप्रियतेचा अंदाज यावरून लावला जाऊ शकतो की नुकतीच केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट लिहून वैभवचे कौतुक केले होते. गिरिराज सिंह यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले होते, "जेव्हा सचिन तेंडुलकर, सुनील गावसकर, युवराज सिंग, ब्रायन लारा आणि ग्रीम स्वानसारखे दिग्गज एकमुखाने म्हणतात की, मी भारतीय फलंदाजी वैभव सूर्यवंशीच्या अवतीभोवती तयार करेन; तेव्हा ती केवळ स्तुती नसते. हा एका विशेष प्रतिभेला जागतिक स्तरावर मिळालेला ग्रीन सिग्नल आहे. वैभव जागतिक क्रिकेटचा सर्वात चमकदार चेहरा बनण्यास सज्ज आहे." या पोस्टनंतर वैभवच्या पदार्पणाच्या चर्चांना उधाण आले होते.

# अभिषेक शर्माचा 'गेम ओव्हर'!

■ ईशान किशनने हिसकावला नंबर-१चा मुकुट

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने बुधवारी (दि. १) पुरुषांची ताजी टी-२० क्रमवारी जाहीर केली असून यामध्ये फलंदाजांच्या यादीत मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे. भारताचा





यष्टिरक्षक फलंदाज ईशान किशनने धमाकेदार कामगिरीच्या जोरावर टी-२० क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले आहे. त्याने त्याचाच संघ सहकारी अभिषेक शर्माला मागे टाकत नंबर १चा मुकुट आपल्या नावावर केला आहे.

सध्या ईशान किशनच्या खात्यात ८७६ रेटिंग गुण असून अभिषेक शर्मा ८६९ गुणांसह दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. आता या दोन भारतीय फलंदाजांमध्ये केवळ ७ रेटिंगचा फरक असून टी-२० क्रिकेटमध्ये भारतीय खेळाडूंचे वर्चस्व यातून स्पष्ट होते. असे असले तरी गेल्या जवळपास १२ महिन्यांपासून अव्वल स्थानावर राज्य करणाऱ्या अभिषेकच्या सिंहासनाला ईशानने अवघ्या सहा महिन्यांत सुरुंग लावल्याचे पाहायला मिळाले आहे.

भारतीय संघातून जवळपास दोन वर्षे बाहेर राहिल्यानंतर ईशान किशनने यावर्षी जानेवारी महिन्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन केले होते. या कमबॅकनंतर त्याने सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली. नुकत्याच झालेल्या आयर्लंड दौऱ्यावर मात्र त्याला विशेष कामगिरी करता आली नाही. त्याने दोन सामन्यांत अनुक्रमे १ आणि १२ धावा केल्या. दुसरीकडे अभिषेक शर्माने आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या सामन्यात ४९ धावांची खेळी केली होती, परंतु दुसऱ्या सामन्यात तो शून्यावर बाद झाला.

# श्रीसंतची क्रिकेट बंदी अखेर मागे

**मुंबई : प्रतिनिधी**

माजी भारतीय क्रिकेटपटू एस. श्रीसंतला मोठा दिलासा मिळाला आहे. केरळ क्रिकेट असोसिएशनने त्याच्यावर घातलेली तीन वर्षांची बंदी अखेर मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे श्रीसंत आता पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानात किंवा क्रिकेटसंबंधीच्या प्रशासकीय भूमिकेत सक्रिय होऊ शकणार आहे.

काही काळापूर्वी श्रीसंतने व्हिज्युअल मीडिया आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून केरळ क्रिकेट असोसिएशनवर काही वादग्रस्त टीका केली होती. या विधानांमुळे असोसिएशनची प्रतिमा मलिन झाल्याचा ठपका ठेवत 'केसीए'ने त्याच्यावर तीन वर्षांची बंदी लादली होती. ही बंदी गेल्या 'केरळ क्रिकेट लीग' हंगामापूर्वी घालण्यात आली होती. श्रीसंतने या शिस्तभंग कारवाईला तिरुवनंतपूरम येथील मुन्सिफ न्यायालयात आव्हान दिले होते, परंतु न्यायालयाने त्याची याचिका फेटाळून लावली होती.

न्यायालयीन दिलासा न मिळाल्यानंतर श्रीसंतने केरळ क्रिकेट असोसिएशनकडे अधिकृतपणे जाहीर आणि बिनशर्त माफी मागितली. आपल्या विधानांबद्दल तीव्र खेद व्यक्त करत त्याने असोसिएशनची माफी मागितली.

